
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 1502
१५६४



अनंत काणेकर

# निवडक

REFBK-0013741

किशोर साहित्य

# निवडक गणूकाका

*निवडक २१ निबंध*

अनंत काणेकर

REFBK-0013741

मूल्य दीड रुपया

[ पुनर्मुद्रणाचे सर्व हक्क पंडित अनंत कुलकर्णी यांचे आधीन ]

प्रथमावृत्ती १९६४

प्रकाशक ;
पंडित अनंत कुलकर्णी,
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार, पुणें २

मुद्रक ;
मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणें २

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १. | " माझा स्वभाव असा आहे ... ! " | ... | २ |
| २. | " तत्त्वांचा पाया ... " | ... | ६ |
| ३. | " शाईनें लिहिणारे लेखक आणि रक्तानें लिहिणारे लेखक ... " | ... | १० |
| ४. | " धर्माचे उपयोग ... " | ... | १४ |
| ५. | " पोरकटपणा ... " | ... | १८ |
| ६. | जगाशीं संबंध | ... | २१ |
| ७. | सद्‌गुणी माणसें | ... | २५ |
| ८. | जीवनशक्ति | ... | २८ |
| ९. | समतेची आवड ! | ... | ३२ |
| १०. | पुरुषाचा स्वभाव | ... | ३६ |
| ११. | " कांहींतरी ... " | ... | ४० |
| १२. | सद्‌गुणांचा अतिरेक | ... | ४३ |
| १३. | दोन पदरी गोफ | ... | ४६ |
| १४. | प्रगतीची किल्ली | ... | ५० |
| १५. | शत्रु करण्याची कला ! | ... | ५४ |
| १६. | तत्त्वनिष्ठा आणि तमासगीर | ... | ५८ |
| १७. | चांगुलपणाचे तोटे ! | ... | ६२ |
| १८. | ही पाहा संस्कृति ! | ... | ६५ |
| १९. | पुराणांतलीं वांगी | ... | ६९ |
| २०. | काय हा योगायोग ! | ... | ७३ |
| २१. | पानिपत झालं नसतं ? | ... | ८१ |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६८४९ ... वि: ...निबंध-
क्रमांक ...१५०२...

# १ “ माझा स्वभाव असा आहे. . . . ! ”

“ माझा आपला सरळ स्वभाव आहे ! पाहिजे तर चार पैसे मागून घेईन, पण तुमचा एक तांब्याचा तुकडा जरी कुठं पडलेला असला, तरी त्याला हात लावणार नाहीं ! हो, आपला व्यवहार सरळ ! ” या वाक्यानें आपलें ब्रीद जाहीर करीत आमच्या नव्या स्वयंपाकिणीनें घरांत प्रवेश केला. सर्व मंडळी खूष झाली तिच्या मोकळ्या स्वभावावर; पण मी मात्र छातीवर हात ठेवून सांगितलें कीं, “ ही चोऱ्या केल्याशिवाय राहत नाहीं ! ”; आणि लवकरच बडा भविष्यवादी म्हणून माझी सर्व घरांत ख्याति झाली ! पण भविष्यज्ञानाची या गोष्टीला कांहींच जरुरी नव्हती. खरोखर सरळ असलेलें माणूस आपल्या सरळपणाची दवंडी पिटीत फिरत नाहीं. त्याचा सरळपणा वागणुकींत दिसतो; स्वतःच्या सरळपणाचे जाहीरनामे काढण्यांत दिसत नाहीं !

पण मनुष्यस्वभाव मात्र हा असा आहे खरा ! आमचे गणूकाका आज वीस वर्षं मला सांगत आहेत,

“ माझा स्वभाव भयंकर रागीट आहे ! एकदां राग आला, मग काय करीन नि काय नाहीं, त्याचा नेम नाहीं ! ” हें वाक्य मी

सतत वीस वर्षं ऐकतों आहें. पण या वीस वर्षांत मी एकदांहि त्यांना खरोखर रागावलेलें किंवा रागावून विशेष कांहीं करतांना पाहिल्याचें आठवत नाहीं ! त्यांचा एक मित्र आहे. तो नेहमीं कांहीं ना कांहीं त्यांच्याकडून पैसे काढीत असतो आणि परत कधींच देत नाहीं. एकदां काकांना पैशांची फार जरुरी होती. आणि त्या मित्रानें त्या दिवशीं पैसे आणून द्यावयाचें कबूल केलें होतें. त्याची यायची वेळ टळत चालली तसे काका मला सांगूं लागले, " त्याला माहीत नाहीं माझा स्वभाव किती भयंकर रागीट आहे तो ! आतां येऊं द्या त्याला पैशाशिवाय, मग पहिल्यांदा मुळीं दोन कानशिलांतच वाजवतों. मग पुढच्या गोष्टी ! "

इतक्यांत तो मित्र येत असलेला माझ्या दृष्टीस पडला. आतां वीस वर्षांनीं आपणांला एक भयंकर, रोमहर्षक दृश्य पाहावयास मिळणार, म्हणून मी श्वास कोंडून वाट पाहात उभा राहिलों. तो मित्र जो सरळ गणूकाकांजवळ आला, तो एकदम उद्गारला, " काल तीन वेळां ती चक्कर येऊन पडली रे ! ॲनीमिया झालाय् म्हणे ! आठ इंजेक्शनं दिलीं पाहिजेत, डॉक्टर म्हणतात; नाहीं तर धडगत नाहीं आणि माझ्या खिशांत तर विष खायला पैसा नाहीं ! " तो गृहस्थ अगदीं रडकुंडीस येऊन बोलत होता.

" अरे, असा वैतागतोस काय ? कांहीं तरी उपाय केला पाहिजे, वेडच्या ? " गणूकाका विरघळून म्हणाले.

" पांच रुपये दे रे मला, मग देतों तुझे, " असें म्हणून गणूकाकांनीं माझ्याकडून पांच रुपये घेतले, आणि त्या गृहस्थाला देऊन त्याला वाटेला लावलें. मी थंडच पडलों ! तो गृहस्थ गेल्यावर मी म्हणालों, " काका, तुम्ही त्याच्या कानशिलांत वाजवणार होतां ना ? मग झालं काय ? "

" अरे बाबा, वेळवखत बघून रागावलं पाहिजे. दारावर

आलेल्या माणसाला काय मारून घालवून देतात ? " असें म्हणून काकांनीं मलाच मूर्ख ठरवलें !

अशी जर वस्तुस्थिति आहे, तर यत्किंचितही सरळ नसलेला माणूस " माझा स्वभाव आपला सरळ आहे ! " आणि मुळींच रागीट नसलेला मनुष्य, " माझा स्वभाव असा भयंकर आहे..." असें लोकांचे कानींकपाळीं ओरडत कां फिरतो ? मला वाटतें, आपणांमध्यें एक मनाचा विशिष्ट दुबळेपणा आहे, आणि आपण तसें नाहीं असें जर जगाला भासविलें नाहीं, तर आयुष्यांतील धकाधकीच्या प्रसंगांच्या माऱ्यानें आपलें व्यक्तित्व कुठच्या कुठें उडविलें जाईल, या भीतीनें प्रत्येक मनुष्य आपल्या भोंवतीं कांहीं तरी नसत्या गुणाच्या चिनी भिंती उभारीत असावा. आपणांत नाहीं तें आहे, असें भासविण्याचा हा मनुष्यस्वभाव, म्हणजे आत्मसंरक्षणाचें एक मनोमय चिलखत ! किती तरी उदारहृदयी माणसें, " मी एक कवडीहि कुठच्या धर्मादायाला देणार नाहीं ! " असें निक्षून सांगत असतात आणि गुप्त रीतीनें कितीतरी परोपकार करीत असतात. आपण उदार आहोंत असें बाहेर कळल्यास याचकांच्या झुंडीवर झुंडी लोटून आपल्या औदार्याचा अन्याय्य फायदा घेतला जाईल, या एकाच भीतीनें हे लोक आपण मुळींच उदार नाहीं असें भासवीत असावेत.

आपण जसे नाहींत तसे आहोंत असें दाखविण्याचें कदाचित् निराळेंही कारण असेल. आपणांत जें कांहीं नाहीं तें असावें, किंवा आपण आहोंत त्यापेक्षां कितीतरी पटीनें मोठें किंवा निराळें असावें, अशी जबरदस्त आवड प्रत्येक माणसाला असते. अंतर्मनांत दबून राहिलेल्या इच्छा आणि आकांक्षा मनुष्य निरनिराळ्या उपायांनीं तृप्त करून घेत असतो. रागीट नसलेला थंड स्वभावाचा मनुष्य, कडक स्वभावाचे लोक जगावर सत्ता चालवितांना पाहातो; आणि आपणही रागीट आहोंत अशी कल्पना करून घेऊन, " माझा

स्वभाव असा भयंकर रागीट आहे !" असें सर्वांना सांगत सुटतो ! तेवढेंच त्याचें समाधान ! लहान मुलांच्या इच्छाही या दृष्टीनें पाहण्यासारख्या असतात. कुणाला तरवार घेऊन लढाईचे खेळ खेळावेसे वाटतात तर कुणाला आगगाडीचा ड्रायव्हर होण्याची इच्छा असते ! कुणाला दरोडेखोरांच्या टोळीचे नायक व्हावेंसें वाटतें तर कुणी लग्नसमारंभांतला बँडवाला होऊं इच्छितो ! प्रत्येकाला आपण कांहीं तरी प्रचंड करावेंसें वाटतें, आणि आप-आपल्या प्रचंडत्वाच्या कल्पनेप्रमाणें प्रत्येक जण तसतशी इच्छा करीत असतो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत खर्डेघाशी करणारा कारकून, खूपसे कारकून बसले आहेत, आणि खरड खरड खरडताहेत असलें दृश्य ज्यांत आहे, असा सिनेमा पाहावयाला जाणार नाहीं. त्याला आवडणारें चित्र म्हणजे सुगंधानें दरवळलेल्या उपवनांत सुंदर पोशाख केलेला तरणाबांड राजपुत्र, आपण पळवून आणलेल्या सुकुमार राजकुमारीला आपल्या शक्तिशाली बाहुपाशांत कवटाळीत आहे ! असें हें दृश्य पाहून तारवटलेला कारकून गटाराची घाण येत असलेल्या आपल्या तळमजल्यावरच्या खोलींत परत येतो आणि डाळभात थंड होईल म्हणून वाट पाहात असलेल्या आपल्या हडकुळ्या प्रियेला कडकडून मिठी मारतो ! जितकें हास्योत्पादक तितकेंच कारुण्यपूर्ण दृश्य आहे हें.

मला वाटतें, परमेश्वराच्या कल्पनेचें मूळही मनुष्यजातीच्या या स्वाभाविक इच्छेंतच असावें. सर्व जगावर सत्ता चालवावी; सूर्य, चंद्र, तारे मन मानेल तसे फिरवावे; ऋतु बदलावे आणि जगाचा गोल तळहातावर नाचवावा; अगणित प्राणी जन्माला घालावे, आणि सुचेल तेव्हां मृत्युसदनीं पाठवावे, पण आपण मात्र अमर राहावें !–मानवाच्या या उत्कट इच्छेचें परिणत स्वरूप म्हणजे चराचरव्यापी, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान् अशा परमेश्वराची

कल्पना! आपण नाहीं तरी दुसरा कोणी तरी आकाशांत असा आहे, तो दयाळु असल्यामुळें आपलें बरें करील, ही निराशलेल्या हतबुद्ध मानवाची आशा! दुबळचा मानवानें आपली कल्पना ताणून स्वतःचें केलेलें समाधान!

# २ "तत्वांचा पाया . . ."

त्या दिवशीं गणूकाका माझ्या खोलींत शिरले, तेव्हां हे खास मला कांहीं तरी बोलणार, असें त्यांच्या चर्येवरून दिसत होतें. आंत शिरले, ते सरळ जाऊन त्यांनीं माझ्या ईझिचेअरवर अंग टाकलें. पण ईझिचेअरचा दांडा मीं नीट लावलेला नसल्यामुळें खुर्चीचा सांधा सरकून क्षणार्धांत त्यांचा नितंबप्रदेश जमिनीवर आदळला आणि दोन्ही पाय एकदम वर गेले ! मीं चटकन् त्यांना सांवरून खुर्ची वगैरे नीट करून दिली. पण झालें तें झालें. त्यांना बोलायला कारण मिळालें.

"हल्लींचे लोक काय गद्धे आहांत रे तुम्ही ! तुमच्या वागण्यांत, राहण्यांत कांहीं तत्त्व आहे का ? कांहीं तरी खायचं ! कसं तरी राह्यचं ! काय रे हें ? एखादा गडी नाहीं ठेवतां येत तुला खुर्च्या नीट लावून ठेवायला ?"

शरीराला बसलेल्या धबक्यामुळें त्यांची तत्त्वनिष्ठा एकदम जागृत झालेली पाहून मी स्तंभितच झालों !

" खुर्चीचा दांडा लावायला विसरलों, त्यांत तत्त्व कसलं आलं आहे, काका ?" मी किंचित् हंसत म्हणालों.

"ते सोड रे. तुझीच एकटयाची गोष्ट नाहीं सांगत, पण एकंदरींत सगळ्याच लोकांचं पाहतों तों कांहीं तत्त्व म्हणून नाहीं आयुष्यांत !"

"तुमची बँकेंत शिल्लक किती आहे, काका ?" मीं अगदीं सहज प्रश्न विचारला. काका आश्चर्यचकित झाले.

"कां रे ?"

"नाहीं म्हटलं, बहुतेक तत्त्वनिष्ठ लोकांच्या तत्त्वांचा पाया त्यांच्या बँकेंत सांपडतो !"

आणि मी जें हें गणूकाकांना म्हणालों तें अगदीं खरें आहे. भरपूर पैसा जवळ असला, म्हणजे सर्व तत्त्वांचें अगदीं व्यवस्थित परिपालन करतां येतें. गणूकाकांच्या इतके माझ्याजवळ पैसे असते तर मीं दोन गडी ठेवले असते. मग खुर्च्या वगैरे सर्व कशा व्यवस्थित राहिल्या असत्या माझ्या खोलींत, आणि ईझिचेअरचा दांडाहि नीट लागला असता.

पण तत्त्वनिष्ठ लोक एवढीच गोष्ट नेमकी विसरतात ! मागल्या मद्यपानबंदीच्या चळवळींतली एक गोष्ट मला आठवते. एका सुप्रसिद्ध देशभक्ताची बायको तलम, रेशमी, स्वदेशी साडी नेसून प्रचारकार्य करावयाला जात असे. सकाळीं दूध, टोस्ट, लोणी वगैरे वस्तूंचा फराळ करून ती बाहेर पडत असे. एकदां एका मजुराला ताडी पितांना पाहून त्याला तिनें अगदीं कळवळल्यानें सांगितलें,

"ताडी पीना हराम है, बाबा !"

"आहे खरं हराम, बाईसाहेब." तो मजूर म्हणाला, "पण, मला जर कोणी रोज सकाळीं अच्छेर दूध प्यायला देईल, तर नाहीं पिणार ताडी."

देशभक्तीण निरुत्तर होऊन घरीं परत आली, असें म्हणतात. मी जर त्या मजुराच्या जागीं असतों, तर याहूनहि झणझणीत

उत्तर दिलें असतें. आकाशांत तांबडें फुटल्यापासून तों गडद काळोख पडेपर्यंत मर मर काम करूनहि स्वतःच्या पोटाची टीचभर खळगी ज्यांना भरतां येत नाहीं, आणि भुकेनें तडफडणाऱ्या आपल्या पोटच्या पोरांना घोटभर दूध देतां येत नाहीं, अशा मजुरांनीं आपला मनःसंताप ताडीच्या बाटलींत बुडवून टाकणें, हे हराम आहे खरें; पण त्यांची ही आर्थिक स्थिति बदलण्याचा कांहीं एक प्रयत्न न करतां, दुधाचे प्याले आणि द्राक्षांचे घड फस्त करून ताडी न पिण्याचा सवंग उपदेश त्यांना करणें, हें हरामाहून हराम आहे !

पण भुकेकंगाल बहुजनसमाजाची आर्थिक स्थिति बदलण्याचा क्रांतिकारक प्रयत्न हे तत्त्वनिष्ठ लोक कसा करतील ? बहुसमाज भुकेकंगाल आहे आणि आपल्या रक्ताचें पाणी करून संपत्ति निर्माण करतो आहे, म्हणूनच या मूठभर तत्त्वनिष्ठ लोकांना या संपत्तीच्या जोरावर दररोज ताडी न पितां निर्भेळ दूध पिणें, घाणेरडे कपडे न घालतां स्वच्छ परीट घडीचे कपडे वापरून स्वच्छता राखणें, आणि गांवांत रोगराई झाली असतां आजारी पडण्याऐवजीं डोंगर-माथ्यावरील उंच हवेशीर ठिकाणीं जाऊन आपल्या आरोग्याची नीट काळजी घेणें, इत्यादि इत्यादि तत्त्वांचें व्यवस्थित परिपालन करतां येतें !

यावर कोणी विचारील, कीं सर्वसंगपरित्याग केलेले स्वार्थत्यागी महात्मे जेव्हां मोठमोठ्या तत्त्वांचा उपदेश करतात तेव्हां त्यांचाहि हेतु स्वार्थीच असतो का ? खरेंच या स्वार्थत्यागाच्या तत्त्वांचा विचार करणें राहूनच गेलें. परवां एका महंताच्या मठांतील सात-आठ लाख रुपयांच्या इस्टेटीसाठीं त्याच्या दोन शिष्यांमध्यें दावा चालला होता, आणि दुसऱ्या एका महात्म्याच्या आश्रमाची किंमत कांहीं लाखांवर गेली आहे, असें म्हणतात. हे महंत आणि महात्मे

स्वार्थत्यागाच्या तत्त्वाचे मोठेच पुरस्कर्ते असतात. कारण गरीब गुरीब बहुजनसमाजाच्या स्वार्थत्यागावरच यांच्या मठांची आणि आश्रमांची भरभराट होत असते आणि श्रीमन्त लोकही या महात्म्यांना उचलून धरतात. कारण आर्थिक दृष्टचा शोषल्या जाणाऱ्या जनतेंत स्वार्थत्यागाच्या तत्त्वाचा जितका फैलाव होईल तितक्या प्रमाणांत सत्ताधारी श्रीमंत लोकांचा स्वार्थ अधिक साधला जाईल. तिजोरीच्या रक्षणाकरितां ज्याप्रमाणें कुत्रे बाळगणें हें धनिकांचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें विषम समाजरचनेच्या रक्षणाकरितां कांहीं महात्मे पदरीं बाळगणें हेंहि तितकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक फायद्याचें आहे. गरीब मूर्खांनीं किंवा पैसेवाल्या बदमाश शिष्यांनीं खाण्यापिण्याची, उठण्याबसण्याची, सर्व कांहीं राजासारखी सोय केल्यानंतर या महात्म्यांना स्वार्थत्यागाच्या तत्त्वाची सर्व जगभर घोषणा करीत फिरायला काय हरकत आहे?

कारण, स्वार्थत्याग म्हणजे संपत्ति संभाळण्याची कांहीं एक यातायात न घेता संपत्तिपासून होणाऱ्या सर्व फायद्यांचा यथेच्छ राजरोस उपभोग घेण्याची कला!

## ३ "शाईनें लिहिणारे लेखक आणि रक्तानें लिहिणारे लेखक..."

लेखक म्हणून मला जर कधीं धन्यता वाटली असेल, तर ती काल. माझ्या एका मित्राच्या घरीं मी काल गेलों. तेव्हां त्याची बायको अगदीं रागारागानें मला सांगू लागली,

"काय लिहितां हो तुम्ही हें भलतं भलतं ?" मीं म्हटलं "काय ?"

"तें व्यवस्थितपणाविषयीं तुम्हीं कांहीं तरी लिहिलंत."

"मग झालं काय, वहिनी ?" मी हंसत हंसत म्हणालों.

"झालं काय ? अहो, आमच्या बेबीनं तुमचा तो लेख वाचल्यापासून कमाल चालवली आहे. एक वस्तु जाग्यावर ठेवील तर शपथ ! शाळेंतून आल्यावर पुस्तकं एकीकडे उडवील, तर कपडे दुसऱ्या कोंपऱ्यांत फेंकून देईल. असा नुसता धांगडधिंगा चालवला आहे. तिनं. आणि बोलायची सोय नाहीं. कारण कांहीं बोलायला गेलं, तर म्हणते, त्या लेखांत पाहा काय छापलं आहे तें. उगाच खोटं कांहीं तरी लोक छापतात वाटतं ? व्यवस्थित राहण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं ! सांगा, आतां हिच्यापुढें काय करायचं ते ?"

वहिनीचे ते शब्द ऐकून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला. इतकी निष्ठावान् शिष्यीण मिळाल्यावर कुणाला आनंद होणार नाहीं ?

खरोखर छापलेल्या शब्दांचा महिमा कांहीं और आहे खरा ! बेबीचीच गोष्ट कशाला. मोठी वयातीत माणसेंसुद्धां कोणतीही छापलेली गोष्ट प्रमाणभूत समजतात. आमच्या गणूकाकांच्या देवादिकांच्या कल्पना तर राजा रविवर्म्याच्या चित्रांवरूनच ठरलेल्या आहेत. या बाबतींत तुम्ही त्यांच्याशीं कांहीं वादविवाद करावयाला जाल, तर ते तुमचें मुळींच ऐकणार नाहींत. उलट तुम्हांलाच मूर्ख ठरवितील ! मीं मात्र त्यांच्या या समजूतीचा एकदां पुरेपूर फायदा घेतला आहे. मी जेव्हां पहिल्यांदाच मिशा काढल्या, तेव्हां ते माझ्यावर भयंकर रागावले.

" काय रे हें ? पुरुषासारखे पुरुष तुम्ही आणि हे काय बायकी चाळे ?"

" हं. काका असं म्हणूं नका हं," मी म्हणालों, " तुमच्या देवांना मिशा आहेत का पाहा बरं. पाहा रविवर्म्याचं रामाचं नाहीं तर कृष्णाचं चित्र. त्यांना तुम्ही बायकी म्हणणार वाटतं ?"

गणूकाकांना माझें म्हणणें पटलें कीं नाहीं कुणाला ठाऊक ? पण त्या प्रश्नावर त्यांनीं मला पुन्हा डिवचलें नाहीं. राजा रविवर्म्यानें माझी बाजू बेमालूम बचावली !

मी जेव्हां बेबीची गोष्ट गणूकाकांना सांगून छापील शब्दांची महती गाऊं लागलों, तेव्हां ते अगदीं कमालीचे अस्वस्थ झाले.

"तें कांहीं नाहीं," ते म्हणाले, " मलासुद्धां आतां लेख लिहून ते छापवून घेतले पाहिजेत. तुझ्या ओळखीचे बरेचसे मासिकवाले आहेत ना रे ? मग माझे लेख छापवून काढ."

" पण तुम्ही लिहिणार कशावर, काका ?" मी म्हणालों.

"कशावर? शेंकडों विषयांवर. देवाचं भजन केल्यापासून फायदे, पैसा कसा राखावा, हें सर्व जग म्हणजे माया आहे, वगैरे वगैरे किती विषय आहेत."

काकांचे तें विषय ऐकून मला हंसू येत होतें, पण त्यांना राग येईल म्हणून मी तें आवरून धरलें. पण काकांना तरी कां हंसावयाचें? लेखक लेखक म्हणून मिरविणारे बरेचसे लोक असलेच शिळे आणि कळकट विचार मोहक आणि मंजुळ भाषेंत घोळवून लोकांना चारण्यापलीकडे दुसरें काय करतात? आणि तुम्ही जर त्यांना म्हणाल,

"काय हो, तुम्हांला स्वतःचं असं जर कांहींच सांगण्यासारखं नाहीं, तर तुम्ही लिहूं नका," तर मोठा गंभीर आव आणून ते तुम्हांला सांगतील, "आम्हांला प्रचंड गोष्टी सांगायच्या आहेत, पण लोकांना पटायला हव्यात ना त्या!"

हे शब्द उच्चारतांना आपण काय म्हणतों आहोंत याची त्यांना बहुधा कल्पना नसते. पण त्यांच्या त्या म्हणण्यांत सत्य मात्र कांठोकांठ असतें. लोकांचे नेते आणि लोकांचे खुषमस्कऱ्ये असे लेखकांचे जर दोन वर्ग केले, तर आपण या दुसऱ्या वर्गांतले आहोंत असाच कबुलीजबाब वरील विधानांत असतो.

बेबीची गोष्ट घेतली काय किंवा गणूकाकांची घेतली काय, छापील शब्दांवर एवढा विश्वास ठेवला जातो, याचा अर्थ इतकाच कीं खऱ्या लेखकाकडून लोक नेतृत्वाची अपेक्षा करतात; खुषामतीची नव्हे. म्हणूनच आपल्या कलेशीं इमानानें वागणारा कोणताहि लेखक केवळ पुढयांत कागद आहे आणि जवळ शाई आहे म्हणून लेखणी उचलणार नाहीं. माझ्या एका आवडत्या ग्रंथकाराचे शब्द मला आठवतात. त्याचें एक लहानसें पुस्तक खूप लोकप्रिय झालें, आणि जो तो येऊन त्याचें अभिनंदन करूं लागला.

अभिनंदनाच्या माऱ्यानें कंटाळून जाऊन तो स्वस्थ बसला असतां एक भक्त आंत शिरून त्याची स्तुति करूं लागला, "किती छानदार पुस्तक आहे तुमचं. किती सुरेख लिहितां तुम्ही !"

"असं ?" तो डोकें वर करून शांतपणें म्हणाला, "माझीं पुस्तकं मी शाईनं लिहीत नाहीं. हृदयांतल्या रक्तानं मी माझा प्रत्येक शब्द लिहितों !" खरंच धंदेवाईक लेखक आणि कलावंत लेखक यांतला फरक हाच, कीं एक आपलें लिखाण शाईनें लिहितो, आणि दुसरा रक्तानें लिहितो.

# ४ " धर्माचे उपयोग... "

आमच्या गणूकाकांचा एक विधुर मित्र त्यांच्याशीं एकदा गप्पा मारावयाला आला होता, तेव्हां त्या दोघांमधला संवाद मला मोठा मनोरंजक वाटला. आपली बायको मेल्यानंतर आपण किती शोकग्रस्त झालों, आणि तें दुःख विसरण्याकरितां आपण काय काय उपाय योजिले, याचें तो वर्णन करीत होता. बायको जिवंत असतांना आपण एखादी दुसरी विडी ओढीत असें, असें तो म्हणाला, पण नंतर दुःख विसरण्याकरितां विड्यांचीं बंडलेंच्या बंडलें तो फस्त करूं लागला, तरीहि कांहीं विसर पडेना ! गांजा ओढून पाहिला, अफूसुद्धां खाऊन पाहिली, पण त्याच्या मनाला समाधान म्हणून मिळेना ! शेवटीं तो धर्माकडे वळला. सकाळ-संध्याकाळ भजन-पूजन, कथा-कीर्तन इत्यादि धार्मिक कृत्यांत तो वेळ घालवूं लागला; आणि त्याच्या मतें धर्माच्या योगानें त्याच्या मनाला बरेंचसें समाधान मिळालें.

या सर्व गोष्टींचें मोठ्या गंभीरपणें तो रसाळ वर्णन करीत होता आणि गणूकाकाहि मान डोलवीत तें ऐकत होते. धर्मभावनेच्या उमाळ्यानें दोघेहि धर्मवीर सद्‌गदित झाले होते. तो निघून

गेल्यावर गणूकाकांनीं चष्म्याच्या कांचांवर बुब्बुळें चढवून माझ्याकडे विजयी मुद्रेनें पाहिलें.

“ धर्माशिवाय गत्यंतर नाहीं, बाबा ! ” मी चीत झालों आहे अशी समजूत करून ते म्हणाले.

“ तें कसं काय ? ” मी म्हणालों.

“ ऐकलंस ना तो काय सांगत होता तें ? ”

“ ऐकलं. मग काय ? ” मी म्हणालों.

“ शेवटीं धर्मानं त्याच्या मनाला समाधान मिळालं ! ”

“ अस्सं. अस्सं. ” मी म्हणालों. “ दु:ख विसरण्याकरितां पहिल्यांदां विडचा, विडचांनंतर अफू, आणि अफूनेंहि समाधान होईना तेव्हां धर्म ! म्हणजे विडचा, अफू आणि धर्म यांत धर्म सर्वांत अधिक प्रभावशाली ठरला ! कबूल, कबूल, बुवा. खरं आहे तुमचं म्हणणं ! ”

काकांनीं रागानें नाकावरचा चष्मा कपाळावर चढविला, आणि माझ्यासंबंधीं सर्व आशा सोडून देऊन ते तडक बाहेर निघून गेले!

मला स्वत:ला धर्म म्हणजे काय तें विशेषसें कळत नाहीं. पण गणूकाकांच्या त्या दिवसाच्या संवादापासून मला थोडी थोडी अंधुक कल्पना येऊं लागली. धर्माचा उपयोग अफूच्या गोळीसारखा केला जातो खरा. अशिक्षित आया ज्याप्रमाणें आपल्या रडणाऱ्या मुलांना अफूची बाळगोळी देऊन घरांतील कामें करावयाला मोकळ्या होतात, त्याप्रमाणेंच आपल्या सदसद्विवेकबुद्धीला धार्मिक अफूच्या गोळीनें झोंपी धाडून कांहीं लोक आपापलीं कामें शांतपणें उरकतात. एकदां रात्रीं नऊ-दहाच्या सुमाराला मुंबईजवळच्या कुठल्या तरी उपनगराला मी आगगाडीनें जात होतों. माझ्या शेजारींच एक मारवाडी बसला होता. मला वाटतें, पेढी बंद करून तो घरीं जात होता, चष्मा लावून आपल्या हिशोबांच्या चोप-

ड्यांचा तो लक्षपूर्वक अभ्यास करीत होता. कांहीं वेळानें त्यानें चोपड्या बंद केल्या. खिशांतल्या नोटा नीट जागच्या जागीं ठेवल्यानंतर शांतपणें त्यानें खिशांतून एक भगवद्गीतेची प्रत काढली, आणि मोठ्या आस्थेनें त्यांतले अध्याय तो वाचूं लागला. वाचतां वाचतां तो इतका उल्हसित झाला, कीं त्याच्यानें राहवेना. माझ्यापुढें पुस्तक धरून तो म्हणाला,

" ज्यो शेट्, ' नायं हन्ति न हन्यते ', आत्मा मारतो बी नथी ने मरतो बी नथी ! भगवान् कृष्णजी कमाल करे छे ! आ, हा हा हा ! "

हिशोबाच्या चोपड्या तपासल्यानंतर दामदुप्पट व्याजानें पिळून काढलेले शेंकडों आत्मे आपल्या नांवानें तळतळाट करणार, या कल्पनेनें बेचैन झालेल्या सदसद्विवेकबुद्धीला ' आत्मा मारतो बी नथी ने मरतो बी नथी ' – आपण मुंड्या मुरगाळलेले आत्मे मरूं शकत नाहींत, आणि आपला आत्मा त्यांना मारूंहि शकत नाहीं— हें तत्त्वज्ञान कां समाधान देणार नाहीं ?

हा झाला धर्माचा किरकोळ उपयोग ! पण सत्ताधारी वर्ग आणि त्यांच्या बगलेंतले धर्मगुरु या धार्मिक अफूचा फार घाऊक प्रमाणावर उपयोग करतात. या जन्मीं मरेमरेतों काम करून भुकेकंगाल राहिलांत तरी हरकत नाहीं; कारण स्वर्गसाम्राज्य तुमच्यासाठींच आहे, इत्यादि धार्मिक संदेशांची भरपूर अफू चारून अज्ञ बहुजनसमाजाला सत्ताधाऱ्यांनीं चालविलेल्या त्यांच्या पिळवणुकीचा भास होऊं न देतां सत्ताधाऱ्यांची सत्ता अबाधित राखण्याचें काम हे धर्ममार्तंड मोठ्या शिताफीनें पार पाडतात. सत्ताधारी वर्गाचा पुरस्कार करणाऱ्या एका प्रख्यात् तत्त्ववेत्त्यानें—नकळत कां होईना—एक सुरेख कबुलीजबाब दिला आहे. परमेश्वराच्या अस्तित्वासंबंधीं साधकबाधक सर्व मुद्यांचा विचार करून थकून

गेल्यानंतर तो म्हणतो, " परमेश्वर जर नसेल, तर आपण एक परमेश्वर निर्माण केला पाहिजे. "

खरं आहे. तो कशाला निर्माण केला पाहिजे तें सांगण्याची जरुरीच नाहीं.

## ५ "पोरकटपणा. . ."

'किती पोरकट आहेस तूं अजून!' असें म्हणून लोक माझी निर्भर्त्सना करतात, तेव्हां त्यांच्या त्या निंदेचा माझ्यावर स्तुतीसारखा परिणाम होऊन मला आनंदाच्या उकळ्या फुटूं लागतात! मी पोरकट आहें याचा अर्थ इतकाच, कीं माझें अंतःकरण अजूनहि ताजें आहे; माझा मेंदू पूर्णपणें तल्लख आहे; मी अत्यंत जिवंत आहें! कारण पोरकटपणा म्हणजे काय? ज्या गोष्टीकडे मोठीं झालेलीं – जुनाट झालेलीं माणसें 'उंः, काय आहे त्यांत!' म्हणून ढुंकूनसुद्धां पाहात नाहींत, त्या गोष्टींतसुद्धां नावीन्य पाहणें आणि त्या नावीन्यानें चकित होऊन क्षणाक्षणाला नवनवीन आनंदानें बेहोष होणें! परवांच माझ्या खोलींत एक मजेदार गोष्ट घडली. संध्याकाळची वेळ होती. मी आणि गणूकाका गप्पा करीत बसलों होतों. माझ्या एका शेजाऱ्याची छोटी मुलगी माझ्याजवळच खेळत बसली होती. काळोख पडूं लागला, तेव्हां बटन दाबून मीं खोलींतला विजेचा दिवा पेटवला. खोलींत एकदम लख्ख उजेड झाल्याबरोबर त्या पोरीला जो आनंद झाला, तो विचारूं नका! खोलीभर ती टाळ्या पिटीत नाचूं-बागडूं लागली.

"बटन दाबल्याबरोबर दिवा कां हो पेटतो ?" तिनें मला लाडिकपणानें प्रश्न विचारला.

"दिवा पेटलेला कधीं जन्मांत पाहिलास नाहीं वाटतं ?" गणूकाका तिच्या अंगावर खेंकसले. आधींच तिच्या अकारण – अर्थात् गणूकाकांच्या दृष्टीनें – नाचण्या-बागडण्यानें गणूकाका भडकले होते. त्यांत आणखी तिनें तो पोरकट प्रश्न विचारल्यामुळें गणूकाका खवळले यांत नवल नाहीं ! बटन दाबल्यावर दिवा पेटतो, आणि दिवा पेटल्याबरोबर काळोखाच्या ठिकाणीं उजेड येतो, यांत गणूकाकांच्या मोठ्या झालेल्या – कीं मेलेल्या ? – मनाला आश्चर्य आणि आनंद कसला वाटणार ? — बटनाला बोट लावल्याबरोबर क्षणार्धांत काळोखी खोली लख्ख, सफेत उजेडानें भरून जाते, हें अद्‌भुतरम्य दृश्य पाहून या चिमुकल्या जिवाला इतका अनावर आनंद झाला, कीं खोलीभर नाचून बागडून तो व्यक्त केल्याशिवाय त्या 'पोरकट' प्राण्याला राहवेना ! इतकेंच नव्हे, तर त्या आनंदाचें कारण काय – बटन दाबल्याबरोबर दिवा कां पेटतो – हें जाणण्याची तीव्र जिज्ञासा तिच्या मनांत उत्पन्न झाली. अर्थात् अशा तऱ्हेची जिज्ञासा व्यक्त करणें हें पोरकटपणाचें लक्षण आहे, असें बऱ्याच मोठ्या माणसांना वाटतें. झाडावरून फळ खालीं पडतांना पाहून न्यूटनच्या मनाला मोठें आश्चर्य वाटलें, आणि त्याच्या कारणमीमांसेचा विचार करतां करतां गुरुत्वाकर्षणाचा जगद्विख्यात सिद्धान्त त्यानें शोधून काढला. पण तें फळ पडत असतांना त्याच्या शेजारीं जर आमचे गणूकाका बसलेले असते आणि फांदीवरून तुटलेलें फळ खालीं जमिनीवर कां पडलें, वर आकाशांत कां गेलें नाहीं, असा प्रश्न जर का न्यूटननें त्यांच्यासमोर उपस्थित केला असता, तर "काय पोरकट आहेस रे तूं ?" म्हणून हंसत हंसत गणूकाकांनीं न्यूटनचा करकचून कान

पिरगळला असता, याची मला बालंबाल खात्री आहे !

माझ्यावर जेव्हां गणूकाका किंवा दुसरे कांहीं लोक पोरकटपणाचाच आरोप करतात, तेव्हां त्यांचीं कारणें निराळींच असतात. खरोखरच केव्हां केव्हां लहान पोरासारखी माझी वागणूक असते खरी ! लहान मुलें ज्याप्रमाणें एखादा पोरकट प्रश्न विचारून इतर लोकांसमोर खोटें बोलणाऱ्या मोठ्या माणसाची मोठीच गैरसोय करतात; त्याप्रमाणें मलाहि पोरकट प्रश्न विचारण्याची मोठी हौस आहे. गणूकाकांचा एक म्हातारा विधुर मित्र आपण लवकरच दुसरें लग्न कां करणार, याची एकदां कारणमीमांसा देत होता.

"मुलांची खाण्यापिण्याची फार आबाळ होते बुवा; लग्न करण्याशिवाय गत्यंतर नाहीं आतां ! " तो मोठ्या गंभीरपणें सांगत होता.

"अहो, मग लग्न कशाला ? एखादा चांगला, हुशार स्वयंपाकी ठेवा कीं !" मी तितक्याच गंभीरपणें त्याला म्हणालों.

तो गृहस्थ निघून गेल्यावर गणूकाका माझ्यावर फारच भडकले. "काय रे, कांहीं तरी पोरकट प्रश्न विचारतोस ? लहान का तूं आतां ? "

खरोखरच म्हातारपणीं बायको हवीशी असतां तसें सरळ सरळ, उघड न सांगतां मुलांच्या खाण्यापिण्याच्या सोयीकरतां बायको करणें भाग आहे, म्हणून खोटें बोलणाऱ्या माणसाच्या ढोंगाचा बुडबुडा एखादा भलताच प्रश्न विचारून फोडणें हें मोठ्या माणसांना शोभतें का ? नग्न सत्य इतक्या निर्भयपणें मांडणें हें फक्त निर्मळ अंत:करणाच्या लहानग्या पोरांनाच शक्य आहे आणि पोरें जें करतात त्याला 'पोरकटपणा' नाहीं तर काय म्हणावयाचें ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

## ६ जगाशीं संबंध

अलीकडे अलीकडे मला जिरवणें, हा गणूकाकांचा व्यवसायच झाला आहे. मी जिरलों आणि माझा चेहरा गोरामोरा झाला म्हणजे गणूकाकांना अपरंपार आनंद होतो ! काल असेंच झालें. गणूकाकांबरोबर मी बोलत बसलों होतों. मी अगदीं बोलण्याच्या रंगांत आलों होतों, " ...मानवजातीच्या हिताकरितां सध्यांची विषम समाजपद्धति आमूलाग्र बदललीच पाहिजे ..." मी एखाद्या पुढाऱ्यासारखा किंवा दारुड्यासारखा बोलत होतों.

" काय रे, ही तुझी मानवजात कुठें असते रे ? " काकांनीं शांतपणें धोतराच्या सोग्यानें चष्म्याचीं भिगें पुशीत मला विचारलें, " आपण कांहीं पाहिली नाहीं कुठें ! ब्राह्मणजात, परभूजात, साळी जात, माळीजात आपणांला माहीत आहे. पण ही कांहीं नवीनच जात दिसते आहे ! "

झालें, मी जिरलों. काकांना आनंद झाला.

मला जिरवण्याकरितां वरील शब्द उच्चारतांना मला जिरवणें हा काकांचा उद्देश होताच; पण थट्टेनें बोलतांना कां होईना, काकांच्या त्या शब्दांच्या मागें एक विशिष्ट मनोवृत्ति होती, यांत

शंका नाहीं. ती मनोवृत्ति म्हणजे, जगाशीं करायचें आहे काय आपणांला ? आपण बरें, आपलें घर बरें; साऱ्या जगाच्या आणि अखिल मानवजातीच्या उठाठेवी हव्यात कशाला ?

एका दृष्टीनें काकांचें हें म्हणणें अगदींच चूक आहे, असें मला वाटत नाहीं. उठल्यासुटल्या प्रत्येक मनुष्य कोणतीहि लहानसहान गोष्ट करतांना त्या गोष्टीचे साऱ्या जगावर आणि अखिल मानव जातीवर काय परिणाम होतील, याचा जर विचार करूं लागला, तर त्याच्या हातून कांहींच होणार नाहीं. व्यापक दृष्टीचा तो अव्यवहार्य अतिरेक होईल. अहिंसातत्त्वाचा फाजील अतिरेक करून स्वतःला हास्यास्पद करून घेणारे कांहीं जैन साधु ज्याप्रमाणें श्वासोच्छ्वासाबरोबर नाकांत जीवजंतू शिरून हिंसा होऊं नये म्हणून नाकावर एक फडकें बांधून फिरतात, किंवा खालीं बसतांना आपल्या अंगाखालीं एखादा जीव चिरडूं नये, म्हणून भुई झाडण्याकरितां एक लहानशी झाडू काखेंत सदैव लटकवितात, त्याप्रमाणेंच प्रत्येक माणसाला वागावें लागेल !

जगाच्या आणि मानवजातीच्या कुणी गप्पा मारूं लागला, कीं पूर्वीं मीहि त्याला काकांच्यासारखाच जिरवीत असें. पण असें करतांना एकदां मात्र मी चांगलाच जिरलों. अर्थशास्त्राच्या एका सुप्रसिद्ध प्रोफेसरांबरोबर एकदां मी चहा पीत बसलों होतों. बोलतां बोलतां प्रोफेसरसाहेब एकदां अगदीं रंगांत येऊन मी जसा काकांना साऱ्या जगाच्या गोष्टी सुनावीत होतों, त्याप्रमाणेंच सारी मानवजात अलीकडे किती परस्परावलंबी झाली आहे, प्रत्येक बारीकसारीक प्रश्नाचा विचार करतांना सर्व मानवजातीचे हितसंबंध आपण कसे डोळ्यांपुढें ठेवलें पाहिजेत, वगैरे वगैरे विषयांवर माझ्यापुढें व्याख्यान झोडण्याच्या बेतांत आले होते. त्यांना जिरवण्याकरितां हातांतला चहाचा कप पुढें करून मी मिस्किलपणें म्हणालों,

"काय हो, या कपांतला चहा पितांना सबंध मानवजातीचे हितसंबंध कसे काय डोळ्यांपुढें आणायचे ?"

माझ्या प्रश्नानें जिरून जाण्याऐवजीं प्रोफेसरसाहेब मला शांतपणें उत्तर देऊं लागले, "चहा पिऊन टाकून तो कप उलटा करून पाहा. कुठें बनवला आहे तो ?"

मीं कप उलटा करून पाहिला. कपावर कोरलेलीं पुढील अक्षरें मीं वाचून दाखविली, "मेड् इन् झेकोस्लोव्हाकिया."

"बरं," ते पुढें बोलू लागले, "कप झेकोस्लोव्हाकियाचा झाला, चहांतील साखर जावा किंवा मॉरिशस बेटांतली, मी दार्जिलिंग चहा वापरतों, तेव्हां चहाची पावडर दार्जिलिंगची. तो दुधाचा 'जग्' आहे तो मेड् इन् चायना–चीनमधला. काय–एक कप चहा पितांना जगाच्या किती भागाशीं तुझा संबंध आला ?"

मी थंडच झालों, प्रोफेसरसाहेबांना जिरवायला गेलों, आणि मीच पुरा जिरलों !

त्या दिवसाचें संभाषण मी कधींच विसरणार नाहीं. व्यवहारापुरती मनुष्यानें कितीहि संकुचित दृष्टि ठेवली, तरी जगाचा आणि आपला किती जिव्हाळ्याचा संबंध आहे, ही गोष्ट त्यानें विसरून जातां कामा नये. कळत अगर न कळत आपण जगाशीं संबंध ठेवतों. कळत अगर नकळत आपणांला जग हवें आहे.

काकांनीं मला त्या दिवशीं जिरवलें, ही गोष्ट माझ्या मनांत सारखी डांचत होती. दोन-तीन दिवसांनीं काकांना जिरवायचा निश्चय करून मी काकांच्या घरीं गेलों. आगाऊ सूचना न देतां शत्रूवर हल्ला करावयाचें मीं ठरविलें होतें. काकांना कल्पनाहि नव्हती मी कशाकरितां आलों आहे त्याची. ते बिचारे ती गोष्ट विसरून गेले होते. बोलतां बोलतां काकांना पकडण्याचा मी प्रयत्न करूं लागलों.

" का हो काका, हजार जातींचीं आणि हजार प्रकारांचीं माणसें या चाळींत आहेत. तुम्ही ही जागा सोडून तिकडे माहीमच्या बाजूला एकान्त जागीं एवढ्याच भाड्यांत लहान घरं मिळतात तिकडे राहायला कां जात नाहीं ?"

काका खुषींत येऊन मला सांगू लागले, " नको रे बाबा तिकडे आपणाला माणसांचा गजबजाट हवा आवतींभोंवतीं. आपल्याला नाहीं एकलकोंडेपणा परवडत. "

" अस्सं ! " मी विजयोत्साहानें बोलूं लागलों, " जगाशीं आणि मानवजातीशीं मला काय करायचं आहे म्हणून मला सांगत होतां नाहीं त्या दिवशीं ! पण या बऱ्यावाईट, तुसड्या, मनमिळाऊ माणसांचा गजबजाट हवाच आहे तुम्हाला आवतींभोंवतीं ! मी तरी काय सांगत होतों, कीं सारा मानवी समाज–"

मीं एकदम आटोपतें घेतलें. काका जिरले होते. पण मीं आणखी लांब जीभ सोडली असती, तर काका तसे कमी नव्हते. ते पुन्हां जिरवायचे !

## ७ सद्‌गुणी माणसें

" दोघी जुळ्या वहिणी, " गणूकाका मला सांगत होते, " एक किती चांगली आहे; आणि ही अशी छिनाल निघाली ! "

गणूकाकांच्या कुठल्या तरी दूरच्या नात्यांतल्या दोन मुलीं-विषयीं गणूकाका बोलत होते. त्या दोघी जुळ्या बहिणीं होत्या. एक कुठल्या तरी श्रीमंत कुटुंबांत दिलेली होती; दुसरी एका गरीब मास्तरला दिलेली होती; ही दुसरी मुलगी कुणातरी सुस्वरूप श्रीमंत तरुणाचा हात धरून पळून गेली होती. साहजिकच त्यामुळें तिच्या बहिणीच्या सद्‌गुणांचा भाव फार वाढला होता ! जो तो तिच्या असलेल्या आणि नसलेल्या विविध सद्‌गुणांची स्तुति करीत होता. आमचे गणूकाका तर पंच-पति-व्रतांत तिला सहावी पतिव्रता म्हणून बसवावयाला जवळ जवळ एका पायावर तयार झाले होते.

" कधीं कुणाकडे डोळा वर करून पाहावयाची नाहीं, " गणू-काका तिच्या सद्‌गुणांचें रसभरित वर्णन करतां करतां म्हणाले, " कीं परक्या पुरुषाबरोबर बोलायची नाहीं ! "

" तुमच्या वर्णनावरून मला ती कांहीं सद्‌गुणांची खाण वाटत

नाहीं." मी शांतपणें गणूकाकांना म्हणालों.

माझ्या शब्दांनीं त्यांच्या उत्साहावर पाणी पडल्यामुळें गणूकाका क्षणभर चमकले; पण लगेच शांतपणाचा आव आणून ते उपरोधिक स्वरांत म्हणाले, "हो, विसरलोंच. तूं नवमतवादी; तुमच्या मतें ती पळून गेलेली छिनाल कार्टीच सद्‌गुणांची पुतळी—!"

"ती सद्‌गुणी होती कीं दुर्गुणी होती, हें ठरविण्याचें धाडस मी करीत नाहीं," मी म्हणालों, "कारण तिच्या एकंदर परिस्थितीची मला कांहींच माहिती नाहीं. पण त्या दुसऱ्या मुलीला मात्र सद्‌गुणी म्हणावयाला आपण मुळींच कबूल नाहीं."

"म्हणजे ऽ ?" गणूकाका उद्‌गारले.

"म्हणजे असं, कीं ती जर एखाद्या गरीब मास्तराची बायको असती, आणि एखाद्या सुंदर, धनवान् तरुणाशीं तिचा संबंध आला असता, आणि त्यानंतरहि ती आपल्या नवऱ्याशीं इमानानें वागली असती, तर कदाचित् तिला मीं सद्‌गुणी म्हटलं असतं. रात्रंदिवस तबेल्यांत कोंडून ठेवलेला घोडा ब्रह्मचर्य पाळतो म्हणून त्याची स्तुति कसली करायची ?"

मोहाला बळी पडणारांची मी तरफदारी करतों, अशांतला भाग नाहीं. पण मोहाला बळी पडूं नये हें सांगणें जितकें सोपें आहे, तितकेंच मोहाला बळी न पडणें हें कठीण आहे, असें मला वाटतें. मोहाचा ज्यांच्यावर कधीं प्रसंगच आला नाहीं, असे सुदैवी प्राणी मोहाला बळी पडलेल्या दुर्दैवी प्राण्यांना 'दुर्गुणी' किंवा 'दुबळ्या मनाचे' म्हणून हंसत असतात. बायकांत तर एकमेकांना अशा तऱ्हेनें नांवें ठेवण्याची प्रवृत्ति अतिशयच प्रबळ आहे, असा माझा अनुभव आहे. एखाद्या पुरुषाच्या प्रेमपाशांत सांपडून एखादी तरुणी त्याच्याबरोबर हिंडूं फिरूं लागली, कीं "इश्श ! अगदींच बाई निर्लज्ज !" म्हणून इतर सोंवळ्या तरुणी तिला

हंसूं लागतात; आणि पुरुषांना ‘इश्श’ ‘इश्श’ करून या अविवाहित पतिव्रता दमल्या, कीं एका सुप्रसिद्ध नाटककारानें म्हटल्याप्रमाणें जो कुणी वेडावांकडा पुरुष यांच्यासमोर पहिल्या प्रथम येईल त्याच्या खांद्यावर विश्रांतीकरितां या मान टेकतात !

आणि मी म्हणतों ‘मोह मोह’ म्हणजे तरी काय ? कोणत्या गोष्टीचा मोह चांगला आणि कोणत्या गोष्टीचा वाईट, हें कोणाला ठरवितां येईल का ? स्वतःच्या मालकीच्या द्राक्षांच्या मळ्यांत भरपूर जेवणानंतर शतपावली करीत असतां, एखाद्या ढेरपोटच्या मालकाला रसभरानें लवलेला एखाद्या द्राक्षांचा घड पाडून त्यांतलीं चार द्राक्षें तोंडांत टाकण्याचा मोह झाला, आणि त्यानें तीं तोडलीं तर त्यांत कांहींच वाईट किंवा चुकल्यासारखें लोकांना वाटणार नाही; पण त्याच मळ्यावरून चाललेल्या एखाद्या भुकेलेल्या भिकाऱ्याची त्या द्राक्षांच्या घडाकडे दृष्टि गेली, आणि त्याच्या तोंडाला पाणी सुटून त्यानें त्यांतलीं चार द्राक्षें तोंडांत टाकलीं तर तो मात्र लोकदृष्ट्या चोरीचा गुन्हा होईल. दोघांनाहि द्राक्षें खाण्याचा मोह झाला; पण समाजाच्या दृष्टीनें एक साव आणि दुसरा चोर ! माझ्या एका आवडत्या लेखिकेची सद्‌गुणी माणसांची व्याख्याच मला फार आवडते. ती म्हणते,

“सद्‌गुणी सद्‌गुणी म्हणून जे मिरवतात, त्यांच्यावर पुरेशा मोहाचा कधीं प्रसंगच आलेला नसतो !”

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३६८४१... दि: ...१.८.७८...
क्रमांक ...१५०२... नों दि: ...२५।८।६८

# ८ जीवनशक्ति

त्या दिवशीं माझ्या खोलींत शिरल्याबरोबर गणूकाकांनीं मला जो प्रश्न विचारला, तो ऐकल्याबरोबर मला हंसूंच कोसळलें. ‘ केळीं खातोस काय ? ’ किंवा ‘ बिस्किटें पाहिजेत काय ? ’ असले घरगुती आणि क्षुल्लक प्रश्न आपण जितक्या सहजपणानें विचारतों, तितक्याच सहजपणानें गणूकाकांनीं आपला रुमाल काढून ठेवीत माझ्या ईझिचेअरवर बसतां बसतां मला विचारलें, “ तुझा ईश्वरावर विश्वास आहे काय ? ”

हा प्रश्न ऐकून मी त्यांच्या तोंडाकडे पाहातच राहिलों. त्यांचा चेहरा पाहतांच माझ्या ध्यानांत आलें, कीं बहुतेक नाना तऱ्हेचे युक्तिवाद करून ईश्वराचें अस्तित्व पटवूं पाहणाऱ्या कुणातरी शास्त्रीपंडिताचें एखादें चोपडें गणूकाकांनीं नुकतेंच वाचलें असावें. असें कांहीं वाचलें, कीं गणूकाकांना तें लगेच पटतें, आणि मग माझ्यावर त्या मुद्द्यांचा मारा करून केव्हां एकदां मला चीत करीन असें त्यांना होतें. अशा वेळीं अगदीं गंभीर चेहेरा करून आणि आपण आतां सहज जिंकणार या कल्पनेनें होणाऱ्या आनंदाच्या गुदगुल्या आंतल्या आंत दाबून ते मोठ्या शांतपणें असला

कांहींतरी प्रश्न मला विचारतात. पण मी आज गणूकाकांना कित्येक वर्षे ओळखतों आहें. असल्या युद्धांत कसले डावपेंच खेळावयाचे, तें मला पुरेपूर माहीत आहे. अशा वेळीं शत्रूची जी अपेक्षा असेल, तिच्या बरोबर उलटें वर्तन आपण करावयाचें, कीं शत्रु गोंधळून जाऊन किंकर्तव्यतामूढ होतो. एखाद्यानें आपणांला कांहीं वाईट शिवी दिली, तर त्याचा हेतु आणि अपेक्षा अशी असते, कीं आपण त्याच्या शब्दशरांनीं विद्ध होऊन चिडून जावें. अशा वेळीं आपण जर चिडलों, तर आपल्या शत्रूचा विजय आणि त्याला आनंद होतो. पण त्याच्या अपेक्षेविरुद्ध जर का आपण हंसरा चेहरा करून शांतपणें त्याच्याकडे पाहिलें, तर तोच पराभूत झाल्यासारखा होतो, आणि मनांतल्या मनांत चरफडतो.

गणूकाकांची अपेक्षा अशी होती, कीं ‘ ईश्वर नाहीं ’ असा मी जबाब देणार, आणि मग आपण आपल्या नवीनच सांपडलेल्या मुद्द्यांचा माझ्यावर मारा करणार. पण मीं गणूकाकांना चांगलेंच चकवलें. ‘ ईश्वर आहे किंवा नाहीं, ’ असा कांहींच जबाब न देतां मीं शांतपणें गणूकाकांना विचारलें, “ ईश्वर म्हणजे काय, तें स्पष्ट सांगा बुवा आपणांला अगोदर; मग तो आहे किंवा नाहीं – मला काय वाटतें तें मी तुम्हाला सांगतों. नाहींतर ईश्वर म्हणजे तुमची एक कल्पना असायची आणि माझी दुसरीच असायची, आणि मी आहे म्हणायचं आणि तुम्हाला वाटतं तसाच आहे असल्या गैरसमजुतीनें उगाच वाद मिटायला नको. वादाचा विषय नक्की झाला कीं मग आपलं सरळ होय किंवा नाहीं म्हणतां येईल. ”

माझ्या अपेक्षेप्रमाणें गणूकाका सर्दच झाले. ईश्वराचें अस्तित्व पटवून देणाऱ्या शेंकडों मुद्द्यांचें गांठोडें पाठीवर मारून ते आले होते, पण ईश्वर म्हणजे काय, हा मुद्दा उपस्थित होईल, याची त्यांना कल्पनाच नव्हती.

" ईश्वर म्हणजे काय, तुला माहीत नाहीं ? " ते चिडून म्हणाले.

" अहो, तें जर मला माहीत आहे, असं तुम्हाला वाटतं, मग ईश्वर आहे कीं नाहीं हा प्रश्न मला विचारण्यांत तरी अर्थ काय ?" मी त्यांना आणखी चिडविण्याकरितां म्हणालों.

बाकी गणूकाकांबरोबरचा असला हा वितंडवाद जरी सोडून दिला, तरी हा प्रश्न प्रत्येक माणसाच्या मनांत जेव्हां तेव्हां उद्भवतो, यांत शंका नाहीं. ईश्वर आहे असें म्हणणारांचें म्हणणें असें असतें, कीं चंद्र, सूर्य, तारे, निसर्गांतले चराचर वस्तुजात आणि मनुष्यप्राणी निर्माण करणारी आणि जगाचे सर्व व्यवहार चालविणारी अशी एक अतर्क्य आणि अगम्य शक्ति असून त्या शक्तीला बरेंवाईट सर्व कांहीं समजतें. ही शक्ति म्हणजेच ईश्वर. या आस्तिक्यवाद्यांच्या मतें अशी शक्ति अस्तित्वांत नाहीं, असें म्हणणारे ते नास्तिक किंवा पाखंडी. मला वाटतें, नास्तिकांची ही व्याख्या चुकीची आहे. कारण आस्तिक असो कीं नास्तिक असो, कुणाहि विचारी माणसाला एक गोष्ट कबूल करावीच लागते, कीं निसर्गाचें जीवन काय किंवा मानवाचें जीवन काय, या सर्वांना चेतना देणारी आणि कांहीं विशिष्ट नियमांनीं बद्ध अशी एक शक्ति आहे. विशिष्ट कक्षेंत विशिष्ट गतीनें बिनचूक फिरणारे चंद्र, सूर्य, तारे किंवा विवेक आणि इच्छाशक्ति असलेल्या मानवजातीचा प्रगतिपर इतिहास पाहिला, कीं या शक्तीच्या अस्तित्वाबद्दल शंकाच राहात नाहीं. ईश्वरवाद्यांत आणि निरीश्वरवाद्यांत खरा फरक माझ्या मतें इतकाच, कीं ही शक्ति सर्वज्ञ आहे, या शक्तीला बरेंवाईट सर्व कांहीं कळतें, असें ईश्वरवाद्याला वाटतें; आणि एकदां गति मिळालेली--कुणाकडून कशी आणि कधीं कुणाला ठाऊक–अशी ही एक गतिमान, बरेंवाईट कांहीं एक ना

समजणारी, आंधळी शक्ति आहे, असें विचारवंत निरीश्वरवाद्याला वाटतें.

तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ जे काय तात्त्विक झगडे लढवायचे असतील ते आपापसांत लढोत; माझ्यासारख्या सामान्य माणसाला इतकें मात्र उघडउघड दिसतें, कीं ही शक्ति मानवी जीवनाला अपूर्णत्वांतून पूर्णत्वाकडे खास नेत आहे; आणि त्याहूनहि अभिमानाची गोष्ट अशी, कीं पूर्णत्वाकडे चाललेल्या या अचाट पण आंधळ्या शक्तीला जाणूनबुजून आणि डोळसपणें मदत करण्याचा अधिकार फक्त विवेकशील अशा मनुष्यप्राण्यालाच आहे.

# ९ समतेची आवड !...

गेल्या वर्षसहा महिन्यांत मी कामाकरितां मुंबईच्या बाहेर फिरत राहिल्यामुळें गणूकाकांची आणि माझी फुरसदीची अशी भेटच झाली नव्हती. अलीकडे मी मुंबईतच येऊन राहिलों आहें हें कळल्याबरोबर गणूकाका परवांच मला भेटावयाला आले, मी लो. टिळकांच्या राजकीय लेखांचा संग्रह वाचीत बसलों होतों.

"काय रे, काय चाललं आहे ?" काकांनीं आंत शिरतां शिरतांच प्रश्न केला.

"कांहीं नाही, लो. टिळकांचे लेख वाचतोंय सहज," मीं पुस्तक बंद करीत उत्तर दिलें.

"माहीत आहेत रे तुझे मोठे टिळक ! आमच्याच शाळेंत होता तो !" काका रुमाल काढून ठेवून कपाळावरचा घाम पुशीत बसतां बसतां उद्‌गारले.

काकांच्या त्या उद्‌गारांची आठवण झाली, कीं मला हंसूं येतें. म्हणजे काकांचें म्हणणें काय, कीं आपल्याबरोबर जो माणूस शिकत होता तो मोठा कसा असेल ? छे, छे, मला नाहीं वाटत काकांचें म्हणणें असें असेल. थोडयाबहुत प्रमाणांत कां

होईना, पण अहंगंडानें (Ego-Complex) पछाडलेला मनुष्य-स्वभाव लक्षांत घेतां स्वत:कडे कमीपणा घ्यावयाचा काकांचा हेतु असेल असें मला म्हणवत नाहीं. माझ्याबरोबर शिकणारा माणूस जास्तींत जास्त माझ्याइतकाच मोठा, किंवा सर्वसाधारणपणें माझ्याइतकाच लहान असावा, असा नकळत कां होईना पण काकांच्या अंतर्मनांतला हेतु असावा. नाहींतर मी म्हणतों, काकासारख्या साध्या माणसाला टिळकांसारख्या मोठ्या माणसासंबंधीं अवमानगर्भ शब्द वापरण्याचा मोह कां व्हावा ? काकांच्या शाळेंत शिकत होते हा काय टिळकांचा अपराध ?

अर्थात् यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. सर्वसाधारण माणसांना आणि मानवी समाजांतलीं बहुसंख्याक माणसें सर्वसाधारणच असतात--आपल्यापैकीं आपल्यासारखाच एक आपल्या पुढें किंवा आपल्या वर गेलेला पाहून कसेंसेंच वाटलें तर नवल नाहीं. पक्ष्यांत नाहीं का आपण पाहात ? एखादा पक्षी जर माणसांत मिसळून माणसाळला, आणि तो आपल्या जातभाईच्या तडाख्यांत सांपडला तर त्याला ते टोंचून टोंचून मारून नाहीं का टाकीत ? अर्थात मानवी प्राणी सुधारलेला असल्यामुळे तो शब्दशल्यांनीं टोंचतो इतकेंच !

माझ्या मतें मानवी मनांत उपजतच असलेल्या समतेच्या आवडीचें हें एक स्वरूप आहे. मात्र ही समतेची आवड याच स्वरूपांत रहावी कीं तिनें निराळें स्वरूप घ्यावें, हा वादाचा प्रश्न आहे. वर गेलेल्याला खालीं असलेल्या बहुसंख्याकांनीं आपल्याबरोबर खालीं ओढून खालच्या पातळींत समता प्रस्थापित करावयाची, कीं आपणच वर जाण्याचा प्रयत्न करून वर गेलेल्यांच्या उच्च भूमिकेवर साम्य साधावयाचें ? मला वाटतें, माणसाला समतेची आवड असावी; पण ती दुसऱ्या तऱ्हेच्या समतेची ! मात्र बहुतेक माणसें

समता साधण्याचा प्रयत्न करतात तो वर गेलेल्याचे पाय खालीं ओढण्याचा प्रयत्न करून !

सुरुवातीला सांगितलेलें आमच्या गणूकाकांचेंच उदाहरण घ्या ना; किंवा आजकाल वृत्तपत्रसृष्टींत घोंघावणारीं टोपणनांवीं वाङमय-चिलटें घ्या. हे कवडीकिंमत उदरंभरू वाटेल त्या लहान मोठ्या साहित्यिकाला किंवा सुप्रसिद्ध राजकीय पुढाऱ्याला वेळीं अवेळीं वैयक्तिक टीकेचे चावे घेत असतात. अमुक अमक कवीचें काव्य टाकाऊ आहे; कारण त्यानें एकापेक्षां अधिक बायका केल्या आहेत ! तमक्या राजकीय पुढाऱ्याची देशभक्ति नकली आहे; कारण त्यानें स्वतःच्या पोटापाण्याची व्यवस्था करून ठेवली आहे ! न्यूनगंडानें जर्जर झालेल्या या प्राण्यांना स्वतःच्या क्षुद्र, दुःखी-कष्टी मनापुढें हेंच सिद्ध करावयाचें असतें, कीं मला कविता लिहितां येत नसतील, पण मी जन्मभर एका स्त्रीशीं इमानानें वागतों आहें कीं नाहीं ? झालें तर मग. तो कवि कसला आला आहे माझ्यापेक्षां श्रेष्ठ. मीहि कांहीं कमी नाहीं ! पोटाकरितां वर्तमानपत्राच्या कचेरींत खर्डेघाशी आणि जाहिराती मिळविण्याची हमाली करण्यापलीकडे माझ्या हातून दुसरें कांहींच सत्कार्य झालें नसेल; पण देशकार्य करणाऱ्या त्या लोकप्रिय पुढाऱ्याचा स्वार्थत्याग माझ्यापेक्षां कांहीं मोठा नाहीं. त्यानेंहि आपल्या मुलांच्या पोटापाण्याची व्यवस्था केलीच आहे कीं नाहीं ? वर वर्णिलेल्या विकृत समतेची आवड हीच अशा तऱ्हेच्या तिरस्करणीय वैयक्तिक टीकेच्या मुळाशीं असते.

उपरोक्त वाङमय-चिलटें ज्याच्यावर नेहमीं जिभल्या चाटीत तुटून पडतात अशा माझ्या एका साहित्यिक मित्राजवळ मीं एकदां सहानुभूति व्यक्त करून " तूं उत्तर कां देत नाहींस ? ", म्हणून विचारलें असतां पुढील मानी जबाब त्यानें मला दिला,

" सिंहाची आयाळ उंदीर कुरतडतात, म्हणून उंदराची शेपटी सिंह कुरतडीत नाहीं ? "

दर्पोक्तीच्या उग्र दर्पानें त्याची ही शब्दपंक्ति घमघमत असली, तरी अंतःकरण उचंबळून टाकण्याची तिच्यांत खास शक्ति आहे. त्याचे ते भव्य शब्द मला फार आवडतात.

# १० पुरुषांचा स्वभाव

मी आणि गणूकाका एकदां असेच ट्राममधून चाललों होतों. ट्राम अगदीं गच्च भरून गेली होती. कितीतरी लोक जागा नाहीं म्हणून तसेच उभे राहून प्रवास करीत होते. इतक्यांत एक तरुण स्त्री ट्राममध्यें चढली. बसावयाला जागा नाहीं असें पाहून ती तशीच उभी राहिली. तिला तशी उभी राहिलेली पाहून एका व्यवस्थित कपडे केलेल्या तरुण गृहस्थानें उठून तिला आपली जागा देऊं केली.

" छे, छे, मला नको जागा. तुम्ही बसा. " असें म्हणून त्या बाईनें त्या सभ्य ग्रहस्थाच्या औदार्याची बोळवण केली.

खजील होऊन तो बिचारा आपल्या जागेवर बसला. मला त्या बाईचा राग आला. पण गणूकाका मात्र अगदीं खूष झाले होते.

" खोड मोडली लेकाची ! " आसुरी आनंदानें काका उद्गारले, " हल्लींच्या तुम्हां लोकांना बायकांना अगदीं डोक्यावर घ्यायला पाहिजे. ती उभी राहिली असती तर काय पाय मोडले असते तिचे ? उगाच बायकांना चढवायचं ! "

" अहो काका, बायकांना चढवून ठेवण्याचा प्रश्न नव्हे हा.

साधा सभ्यपणासुद्धां दाखवूं नये का बायकांना ? " मी म्हणालों.

" स्त्रियांना समान हक्क देतां ना रे, तुम्ही ? " काका मला विचारूं लागले, " मग तुम्हांला उभं रहावं लागलं तर स्त्रिया देतात तुम्हांला उठन जागा ? नाहीं ना ? मग तुमचाच काय येवढा सभ्यपणा उतूं जातो ? "

काकांच्या या समान हक्काच्या मुद्यानें मात्र मी गोंधळलों. कारण काकांनीं या बाबतींत बायकांना पुरुषांइतकेच काय पण पुरुषांपेक्षांहि अधिक हक्क दिले होते. पुरुष नेहमीं स्वतःला अडचणीची जागा घेऊन बायकांना चांगली देतात ना? घोड्याच्या गाडींतून जातांना काका नेहमीं गाडीच्या मोठ्या थोरल्या मागच्या जागेवर बसतात. आणि पुढच्या म्हणजे गाडीवाल्याच्या बैठकीखालच्या छोट्या जागेवर काकूंना बसवतात. त्याचप्रमाणें कुठें बाहेरगांवीं जावयाचें असल्यास बोरीबंदर स्टेशनवर गाडींतून उतरल्यावर आम्ही हल्लीचे पुरुष स्वत: गाठोडीं उचलतों, किंवा हमाल करतों; त्याप्रमाणें न करतां पुरुषांइतकाच गाठोडी उचलण्याचा हक्क स्त्रीजातीला देण्याकरितां गाठोडीं वगैरे दरवाजापासून प्लॅटफॉर्मपर्यंत ते काकूंनाच न्यावयाला लावतात. बाकी आम्ही नवे लोक या बाबतींत ढिले खरे ! तत्त्वनिष्ठा आणि अर्थप्राप्ति यांचा सुंदर मिलाफ करणें शिकावयाचें असल्यास हे जने लोकच आदर्श होत ! स्त्रियांना समान हक्क देऊनच्या देऊन त्यावर आणखी हमालाला द्यावयाच्या एका आण्याची ते बचत करतात.

काकांच्या त्या समान हक्काच्या मुद्यानें मी चीत झालों खरा, पण एक गोष्ट मात्र राहून राहून माझ्या मनाला डांचत होती. खरोखरच त्या बाईला दुसऱ्यांना त्रास द्यावयाची इच्छा नव्हती, कीं स्त्रियांच्या समान हक्काची जागती जाणीव असलेली ती एक

तेजस्विनी होती ? पुरुषांकडून कोणत्याहि प्रकारें उपकृत करून घेतल्यास आपल्या स्त्रैण स्वाभिमानाची पायमल्ली झाल्यासारखें होईल म्हणून तिनें त्या गृहस्थाच्या स्त्रीदाक्षिण्याचा अव्हेर केला ?

एखादा गृहस्थ जेव्हां स्त्रीदाक्षिण्य दाखवितो, तेव्हां केवळ आपण पुरुष असून स्त्रियांपेक्षां श्रेष्ठ आहोंत या भावनेनें प्रेरित होऊन स्त्रीला तिच्या दुर्बलतेची किंवा अगतिकतेची जाणीव करून देण्याकरितां तो तसें करतो, असें मला मुळींच वाटत नाहीं. अर्थात् कांहीं स्त्रीलोलुप पुरुष आपल्याकडे स्त्रियांचीं मनें आकर्षिण्याकरितां दाक्षिण्याचा आव आणतात किंवा 'ताई', 'माई' म्हणून स्त्रियांभोंवतीं गोंडा घोळतात, हें मला माहीत आहे. घरांतल्या स्वतःच्या बहिणींकडे ढुंकूनहि न पाहातां इतर लोकांच्या बहिणींवर भ्रातृप्रेमाचा वर्षाव करणाऱ्या या थोर महात्म्यांच्या उदात्त हेतूंचा संशय घेणें रास्त नव्हे; पण माझ्यासारख्या सामान्य माणसाला या उदारमतवाद्यांच्या उदार हेतूंची उदात्तता कांहीं केल्या पटत नाहीं, त्याला माझा इलाज नाहीं.

या असल्या पुरुषांचें स्त्रीदाक्षिण्य एकवार दृष्टिआड केलें, तर स्त्रियांच्या बाबतींत मार्दव किंवा दाक्षिण्य दाखविणाऱ्या सर्वच पुरुषांचा हेतु स्त्रियांना बरोबरीच्या न समजतां त्यांना कमी लेखण्याचा असतो, याची मला खात्री पटत नाहीं.

पुरुषांच्या स्त्रीदाक्षिण्याच्या मुळाशीं कांहींतरी उदात्त भावना असावी, अशी माझी कल्पना आहे. पुरुष स्त्रियांना समान हक्क देवोत, किंवा अधिक हक्क देवोत, एक गोष्ट निर्विवाद आहे. निसर्गानें मात्र स्त्रियांना समान हक्क दिलेले नाहींत. कांहीं अधिक दिले आहेत, कांहीं कमी दिले आहेत; पण समान मात्र खास नाहींत. मानवी जीवनाचें सातत्य राखण्याची मानाची पण भयंकर जबाबदारी स्त्रीच्या अंगावर टाकून तिच्या जीवनाची एक बाजू

निसर्गानें कायमची पांगळी करून टाकली आहे. आगामी जीवनाच्या जोपासनेकरितां स्वतःच्या जीवनांतल्या कितीतरी सुखांवर पाणी सोडून, आणि केव्हां केव्हां स्वतःच्या प्राणाचेंहि मोल देऊन निसर्गानें तिच्यावर टाकलेली ही असामान्य जबाबदारी ती पार पाडीत असते. तिच्या या निःस्वार्थी कार्याबद्दल--महनीय मातृपदाबद्दल—अंतर्मनांत न कळत दबा धरून बसलेला उदात्त आदर हाच पुरुषांकडून स्त्रियांच्या बाबतींत दाखविल्या जाणाऱ्या मार्दवाच्या मुळाशीं असावा, असें मला वाटतें. पुरुषांच्या स्वभावाचें हें पृथक्करण कुणाला पटो, अगर न पटो, मला तें पटवून घ्यावेंसें वाटतें.

# ११ " कांहींतरी . . . "

माझ्या ओळखींचे एक वृद्ध गृहस्थ आहेत. त्यांना जर कधीं आपण सहज विचारलें, "काय हो, काय चाललं आहे अलीकडे ?" तर त्यांचें या प्रश्नाला उत्तर ठरलेलें आहे, "कांहीं नाहीं. करतों आहें कांहींतरी." या कांहींतरीचा तुम्हांला कधींच उलगडा होत नाहीं. या गृहस्थांचें हें नेहमींचेंच आहे. पण त्यांत त्यांना आपण विशेष हंसण्यासारखें कांहीं आहे, असें मला वाटत नाहीं. आपणांपैकीं बहुतेक जण कितीतरी वेळां अशींच उत्तरें देतात. एकदां तर गणूकाकांशीं या 'कांहींतरी' वरून माझें कडाक्याचें भांडण झालें.

कुणातरी प्रख्यात राजकीय पुढाऱ्याच्या कार्यक्रमावर मीं सडकून टीका केली; आणि त्याला खूप शिव्या हांसडल्या. गणूकाका पडले त्या देशभक्ताचे परमभक्त. संतापून त्यांनीं माझ्यावर उलट हल्ला चढविला.

"त्यांच्या कार्यक्रमांत असतील दोष. पण तुम्ही कांहींच करीत नाहीं त्यापेक्षां तर तो 'कांहींतरी' करतो आहे देशासाठीं." गणूकाका ओरडले.

"खरं आहे," मी म्हणालों, "आम्ही देशाचं बरं वाईट कांहींच करीत नाहीं. तो कांहींतरी म्हणजे थोडं कां होईना, पण देशाचं नुकसान करतो आहे! कांहींच न करण्यापेक्षां नुकसान केलेलं काय वाईट, असंच की नाहीं, काका?"

या 'कांहींतरी'ची मला फार चीड येते. एखाद्या गोष्टीचीं नीटशीं स्पष्ट कल्पना नसली, डोक्यांत कसला तरी घोटाळा उडालेला असला, कीं तो घोटाळा लपविण्याकरितां या 'कांहीं-तरी'चा ढालेसारखा उपयोग करण्यांत येतो, असें मला वाटतें. पुष्कळ लोक माझ्याकडे केव्हां केव्हां लेख मागायला येतात. साह-जिकच मी त्यांना पहिला प्रश्न असा विचारतों, "कोणत्या विषया-वर लेख पाहिजे बुवा तुम्हांला?"

ते मोठ्या गंभीरपणाचा आव आणून शांतपणानें मला उत्तर देतात, "तसं कांहीं नाहीं. 'कांहींतरी' लेख द्या तुम्ही लिहून!"

स्वतःला काय पाहिजे हें यांना स्वतःलाच जर माहीत नसतें, तर लेख जमविण्याच्या आणि ते छापण्याच्या भानगडींत हे लोक पडतात तरी कशाला? स्वतःच्या डोक्यांतला गोंधळ झांकण्या-करितां या 'कांहींतरी'चा उपयोग केला, तर मी म्हणतों तें एक वेळ क्षम्य आहे, पण कांहीं लोक स्वतःचा गोंधळ लपवून वर आणखी दुसरा मनुष्य गोंधळलेला गद्धा आहे हें सिद्ध करण्या-करितां जेव्हां या 'कांहींतरी'चा उपयोग करतात, तेव्हां मात्र मला मनुष्यस्वभावाचा मोठा अचंबा वाटतो.

आमच्या गणूकाकांचा मुलगा बरेच दिवस नोकरीशिवाय घरीं रिकामा बसलेला आहे. कांहींना कांहीं काढून गणूकाका त्याच्यावर नेहमीं रागवतात. एकदां अगदीं त्रासून गणूकाका मला सांगूं लागले, "काय बावळट पोरगा आहे हा! मी त्याला सांगतों आहें, अरे

'कांहींतरी' उद्योग कर. पण म्हणतो, काहीं सुचतच नाहीं. आतां काय करावं याला ?"

"तुमचं म्हणणं काय ? त्यानें काय उद्योग करावा ?" मी म्हणालों.

"अरे, अमुकच कर असं मी तरी कुठें म्हणतोंय ! माझं म्हणणं एवढंच कीं स्वस्थ बसण्यापेक्षां आपलं 'कांहींतरी' करावं !"

मला हंसू आवरेना. त्याला कांहीं सुचत नाहीं म्हणून काका त्याला बावळट म्हणत होते. आणि त्यानें काय करावें म्हणून मीं विचारतां त्यानें 'कांहींतरी' करावें असें मोठ्या पोक्तपणानें काका मला बेधडक सांगत होते. माझ्या मतें 'कांहींतरी' ही मनुष्याच्या हतबुद्धतेची फडकणारी पताका आहे. हंसू येतें तें मनुष्य ही पताका विजयपताका म्हणून खांद्यावर घेऊन मिरवतो त्याचें. आणि आतां अगदीं माझी स्वतःची 'अंदर की बात' सांगायची म्हणजे आज जेव्हां मला लिहावयाला कांहींच सुचेना तेव्हां मीं विचार केला, कीं या 'कांहींतरी'च्या सोयिस्कर पांघरुणाखालीं आपण आपली हतबुद्धता खुशाल झांकावी !

## १२ सद्गुणांचा अतिरेक

गणूकाकांच्या त्या वागणुकीचा मला अर्थच समजेना. चांगले अर्धा-पाऊण तास माझ्याबरोबर मोठ्या मजेंत बोलत बसले होते आणि उठून जातांना ते असें काय करतात याचा मला उलगडा होईना. 'जातों' म्हणून सांगून ते बाहेर पडले. मीहि त्यांना पोंचवायला गॅलरीपर्यंत गेलों. बाहेर दांडीवर वाळत असलेल्या माझ्या कपड्यांकडे त्यांचें सहज लक्ष गेलें, आणि एकदम रागीट चेहरा करून त्यांनीं त्यांतले एक-दोन टॉवेल्स नि सदरे ओढून घेतले आणि ते कांखेंत मारून तडक चालायला लागले !

'अहो गणूकाका, माझे कपडे काय म्हणून पळवतां ?' मी ओरडलों.

'पळवतों काय ? तूं चोरी करून नेतोस त्यापेक्षां मी तुझ्या डोळ्यांसमोर नेतोंय् तें कांहीं वाईट नाहीं. माझ्या वस्तूबरोबर तुझ्याही एक-दोन नेल्याशिवाय तूं वठणीवर यायचा नाहींस !' माझ्यावर एकदम उलटून काका म्हणाले.

'म्हणजे !' मी स्तंभित होऊन उद्गारलों, 'काय, झालं काय ?'

‘ झालं काय ? त्या दिवशीं पुण्याला आमच्याकडे येऊन उतर-लास आणि जातांना आपल्या कपड्यांबरोबर माझाहि एक टॉवेल गुंडाळून नेलास ! अरे, चांगला वाटला तर मागून न्यायचा. अशी चोरी कां ? ’

काकांचे हे शब्द ऐकून तो सर्व प्रकार माझ्या ध्यानांत आला. तें असें झालें. स्वतःला लागलेल्या कांहीं वाईट संवयी घालवून द्यायचा मी प्रामाणिकपणें प्रयत्न करीत होतों. पण तें हें असें उल-टेंच गळ्यांत आलें.

कांहीं दिवसांपूर्वी गणूकाका पुण्याला जाऊन महिना पंधरा दिवस राहिले होते. मध्यें एकदां रजा होती म्हणून दोन-तीन दिवस मी त्यांच्याकडे जाऊन राहिलों होतों. कुठेंहि गेलों कीं परत येतांना कांहीं तरी वस्तु मागें विसरून यायची मला फार वाईट संवय आहे. ती घालवून द्यायचा मी अलीकडे जोरानें प्रयत्न करतों आहें. पुण्याहून परत यायला निघतांना माझ्या कपड्यांची जेव्हां मी आवराआवर करावयाला लागलों, तेव्हां साधारणपणें माझ्या टॉवेलसारखाच दिसणारा एक टॉवेल माझ्या कपड्यांतून जास्त येतो आहे, असा जबरदस्त संशय मला येत होता. पण शहाणपणानें मीं असा विचार केला, कीं एक वेळ दुसऱ्याची एखादी वस्तु आपल्याबरोबर जास्त आली तरी चालेल, पण नेहमींप्रमाणें स्वतःची विसरायला तरी नको ! हो, पुढें नक्की खात्री झाली तर दुसऱ्याची वस्तु परत देतां येईल. स्वतःची विसरभोळेपणाची संवय घालविण्याच्या भरांत वरीलप्रमाणें मीं मोठा शहाणपणा केला खरा, पण त्याहीपेक्षां भयंकर अशी चोरीची वाईट संवय लावून घेतली !

छे छे ! मला वाटतें माणसाला लहानसहान दुर्गुण जरूर असा-वेत. सद्गुणांचासुद्धां अतिरेक चांगला नव्हे. फार सद्गुणी व्हायचा

प्रयत्न केला कीं माझें जसें झालें त्याप्रमाणें एखादा लहानसा दुर्गुण जायचा, पण त्याहीपेक्षां मोठा दुर्गुण अंगीं जडायचा ! माझ्या एका मित्राची अशीच गंमत झाली. त्याला विडी ओढण्याची संवय होती. त्याच्या बायकोला या घाणेरड्या संवयीचा अतिशय राग येई, आणि दोघांचें कडाक्याचें भांडण होई. शेवटीं तडजोड होऊन विडी सोडून दिल्यास तपकीर ओढण्याची परवानगी त्याच्या बायकोनें त्याला दिली. कांहीं दिवसांनीं नासिकारसानें बरबटलेले टॉवेल्स आणि तपकिरीच्या पिवळ्या डागांनीं डागाळलेले सदरे यांची साऱ्या घरांत इतकी घाण झाली, कीं ' विडी ओढा पण तपकीर सोडा ' म्हणून त्याची बायको त्याचे पाय धरून विनवूं लागली !

म्हणूनच मी म्हणतों, कीं फार सद्‌गुणी होण्यांत अर्थ नाहीं. मला तर अतिसद्‌गुणी माणसांची भीतिच वाटते. मी त्यांच्यापुढें भीतियुक्त आदरानें मान लववीन, पण अंतर्यामींच्या उमाळ्यानें त्यांच्याविषयीं मला प्रेम वाटणार नाहीं. खंबीरपणा आणि दुबळेपणा, सद्‌गुण आणि दुर्गुण यांचें कांटेतोल मिश्रण म्हणजेच मला वाटतें, माणुसकी !

## १३ दोन पदरी गोफ !

गणूकाकांच्या त्या प्रश्नांना उत्तरें देणें खरोखरच कठीण होतें. मी म्हणत होतों, कीं इतिहासाच्या सुरवातीपासून आतांपर्यंत अडखळत कां होईना, पण जगाची सारखी प्रगति होत आहे – जग सुधारत आहे. गणूकाकांच्या मतें जगाची सारखी परागति होत आहे – जग दिवसेंदिवस वाईट होत चाललें आहे. आणि माझ्या युक्तिवादाला त्यांनीं दिलेलीं उत्तरेंहि समर्पक होतीं. मी म्हणालों, " ज्यावेळीं क्षुधाशमनासारखी मामुली गोष्ट करण्यासाठीं मानवप्राणी दिवसरात्र हिंस्र श्वापदांशीं झुंज करून चार कंदमुळं मिळवीत होता, झाडांच्या सालींनीं आपल्या अब्रूचं रक्षण करीत होता, आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याकरितां कित्येक दिवस पायांनीं रखडत होता, त्या वेळच्या माणसापेक्षां वाटेल तेव्हां वाटेल तिथं बसून चहाकॉफी पिणारा, तलम रेशमी वस्त्रं परिधान करणारा आणि हजारों मैलांचं अंतर हां हां म्हणतां ओलांडून जाणारा आजचा मानव अधिक पुढें गेलेला – सुधारलेला – तुम्हांला वाटत नाहीं काय ? इतकं असूनहि जग दिवसें दिवस मागं जातं आहे – वाईट होतं आहे, असंच तुम्हांला वाटतं ?"

माझें म्हणणें पुरें करूं देण्याइतकासुद्धां गणूकाकांना धीर नव्हता. मी थांबलों मात्र, गणूकाकांनीं आपली सरबत्ती सुरू केली. " तुझं म्हणणं सगळं ठीक आहे," ते म्हणाले, "पण सर्व प्रगतीचा – सुधारणेचा हेतू काय ? माणसाचं सुख हाच ना ? तुझ्या सुधारणे-बरोबर माणसांचीं दुःखंहि शतपटीनं वाढलीं आहेत. पूर्वी आग-गाड्या आणि मोटारी नव्हत्या, पण त्यामुळं माणूस अधिक सुखी होता. तुमच्या मोटारींनीं तुम्ही हां हां म्हणतां इकडून तिकडे जातां खरे, पण तुझ्या मुंबई शहरांतच रोज शेंकडों माणसं मोटारखालीं सांपडून मरतात ! पूर्वींचीं माणसं कंदमुळांवर भूक भागवीत होतीं आणि वल्कलांनीं अब्रू झांकीत होतीं हें खरं आहे, पण चहा आणि कॉफी यथेच्छ पिऊन नंतर अमक्याचं फ्रुट–सॉल्ट आणि तमक्याच्या लिव्हर–पिल्स घेत डॉक्टरांचे उंबरठे झिजविणाऱ्या तुम्हां लोकांपेक्षां तीं सुखी होतीं खास !"

सुखाचीच कसोटी सुधारणेला लावायची – आणि तीच लावणें योग्य आहे – तर काकांच्या या भडिमारानें मी थोडा वेळ सर्द झालों हें कबूल केलेंच पाहिजे. पण थोडा वेळच. तेव्हां मोटारी आणि यांत्रिक सुधारणा नसल्यामुळें अपघात होत नव्हते आणि म्हणून त्या वेळचे लोक सुखी होते, आणि आज यांत्रिक सुधारणेच्या काळांत शेंकडों लोक हरघडी मोटारखालीं सांपडून चिरडले जातात म्हणून आजचे लोक दुःखी आहेत, हें म्हणणें प्रतिपक्षाला क्षणभर निरुत्तर करून टाकणारें असलें, तरी नुसत्या गणिती हिशेबानेंसुद्धां तें अजिबात फोल आहे हें दाखवून देतां येईल. फार क्काय, पण त्या वेळच्या सुखदुःखांची वजाबाकी करून उरलेल्या सुखापेक्षां आजच्या सुखांतून दुःख वजा जातां उरलेलें सुख कदाचित् कांकणभर अधिकच भरेल हेंहि सिद्ध करणें कठीण नाहीं. त्या वेळीं मोटारीचे अपघात नव्हते, पण हिंस्र श्वापदांनीं गजबज-

लेल्या मार्गांनीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातांना किंवा नुसती रोजची भूक भागविण्याकरितां भयंकर जंगलांतून कंदमुळें धुंडाळतांना किती माणसें मृत्युमुखीं पडत होतीं असतील ! आणि कंदमुळांवर राहिल्यामुळें त्यांना लिव्हर-पिल्स किंवा फ्रूट-सॉल्टची जरुरी भासत नव्हती पण जर एखादी विकृति शरीरांत उद्भवली तर योग्य औषधांच्या किंवा शस्त्रक्रियेच्या अभावीं किती लोक असह्य वेदनांनीं व्याकुळ होत प्राण सोडीत असतील ?

गणूकाकांना गप्प करायला हा आंकडेंवारी हिशेब खूप झाला; पण माझें स्वतःचेंच यानें तितकेंसें समाधान होत नाहीं. टोपलींतल्या आंब्यांप्रमाणें किंवा गोणींतल्या तांदळांप्रमाणें सुखदुःखाचें मोजमाप थोडेंच करतां येतें ? मग उगाच वजाबाक्या करण्यांत अर्थ काय ? मानवी सुधारणेच्या इतिहासांत सुखाबरोबर दुःखाची वाढ झाली आहे हें कबूल; पण गणूकाकांसारख्यांचें तोंड बंद करायचें म्हणजे, त्यांच्या म्हणण्याचा अर्थ खरा आहे असें धरून चालल्यास त्यापासून अनर्थ कसा होतो हें दाखवून देऊन, सुखाबरोबर दुःखें वाढलीं म्हणून सुधारणेला कुधारणा म्हणून हंसायचें, किंवा प्रगतीची परागति म्हणून हेटाळणी करावयाची; तर डोंगरमाथ्यावरून उषःकाल पाहाणाऱ्या माणसाची खालीं पायथ्याकडे काळोखांत उभ्या राहिलेल्या माणसानें कींव करायला हरकत नाहीं ! तो मनुष्य अभिमानानें म्हणू शकेल, कीं 'या डोंगरमाथ्यावरल्या माणसाचा पाय घसरला तर खालीं कोसळून त्याला किती भयंकर मृत्यु येण्याचा संभव आहे ! मला तसली कांहींच भीति नाहीं – मी खंबीर जमिनीवर उभा आहें !' किंवा क्लिओपात्रासारख्या त्रैलोक्यसुंदरीच्या प्रेमाची माधुरी चाखून भग्नहृदय झालेल्या सीझरसारख्या पुरुषश्रेष्ठाला एखादा सामान्य कारकूनसुद्धां छाती फुगवून सांगू शकेल, कीं 'मी किती सुखी आहें पाहा !

तुझ्यासारखी तळमळ आणि तडफड मला माहीतसुद्धां नाहीं; कारण प्रेम आणि प्रणय असल्या भानगडींत मी कधीं पडलोंच नाहीं!' आणि याच हिशेबानें माणसापेक्षां दगड अत्यंत सुखी ठरेल – कारण त्याला भूक नाहीं, तहान नाहीं, रोग नाहीं कीं राई नाहीं, ताणाताण नाहीं कीं कसली यातायात नाहीं, कसला लढा नाहीं कीं झगडा नाहीं !

सुखाच्या कल्पना करतांना आम्ही विसरतों तें हेंच, कीं जीवन म्हणजे झगडा. जीवन म्हणजे कांहीं सारखी लांबत जाणारी एकपदरी माळ नव्हे,–जीवन म्हणजे परस्परविरुद्ध प्रवृत्तींचा ना आदि ना अंत असा दोनपदरी गोफ! प्रगत जीवन–मोठें जीवन म्हणजे लढा- तीव्र झगडा. मोठ्या लढ्यांत जखमा मोठ्याच होणार, पण या लढ्यांतला विजयही मोठा. आणि त्या विजयाचें सुखही मोठेंच नाहीं काय ? पूर्वींच्या मानावांपेक्षां आम्हां आजच्या मानवांना मोठ्या दुःखांशीं लढण्याचा मोठा मान मिळाला आहे. झालें तर. हीच आमची प्रगति !

# १४ प्रगतीची किल्ली

अलीकडे गणूकाकांना माझा राग येऊं लागला आहे. एक-दोन दिवसांपूर्वी कसल्या तरी तत्त्वज्ञानाच्या गोष्टी करीत मी आणि माझा एक मित्र बसलों होतों. इतक्यांत गणूकाका तेथें आले. आमच्या गोष्टी त्यांच्या कानांवर पडल्याबरोबर इतके दिवस मनांत धुमसत असलेला राग बोलून दाखवायला त्यांना चांगलीच संधि मिळाली. मला मध्येंच थांबवून ते म्हणाले,

" अलीकडे तूं फारच शहाणपणा दाखवूं लागला आहेस ! कांहीं तरी एखादी क्षुल्लक गोष्ट घ्यायची, किंवा मी चुकून बोललेला एखादा शब्द धरायचा आणि त्यांतून मोठ्ठं कांहीं तरी तत्त्वज्ञानाचं अवडंबर काढायचं ! तूं तोडलेले अकलेचे तारे गेले कित्येक दिवस वाचतोंय मी. मला त्यांत कांहीं तथ्य वाटत नाहीं. हो, स्पष्ट सांगतों--"

" अहो पण, काका, " मी माझी बाजू मांडण्याकरितां त्यांना थांबवून बोलायचा प्रयत्न करूं लागलों.

" तें कांहीं सांगू नकोस मला, " आपला आवाज अधिकच चढवून काका ओरडले, " तुम्ही अलीकडचे लोक स्वतःच्या

फायद्याकरितां केलेली एखादी बारीकसारीख गोष्टसुद्धां केवढी फुगवून, जणूं काय जगाच्या कल्याणाकरितां तीं केली आहे, असं भासवतां ! इकडचीं तिकडचीं इंग्रजी पुस्तकं वाचतां, आणि त्यांत सांपडलेल्या मोठमोठ्या जाडजूड शब्दांचा भडिमार करून आम्हां लोकांना चकित करून सोडतां. आम्हांला तें कांहीं जमत नाहीं. आम्ही आपले सरळमार्गी लोक. आम्हांला आमच्या तरुणपणीं एखादी चांगली मुलगी दिसली तर आम्ही आमच्या आईबापांना सांगत असूं, कीं मुलगी चांगली आहे. इच्याशीं लग्न करून मला संसार करायचा आहे नी चार पोरांचा धनी व्हायचं आहे ! तुम्ही एखादी सुंदर पोरगी पाहिलीत कीं काय शब्दांचं वादळ उठवतां ! दिव्य प्रेम काय, अमरज्योति काय, नी काय काय ! आणि इतकं करून शेवटीं आम्ही केलं तेंच करतां ! – ”

“ मीं असं केलं तरी काय काका ? ” मी म्हणालों.

“ सांगतों, धीर धर. ” काका म्हणाले, “ परवां तूं तें एका लेखांत लिहिलंस, कीं लिहा म्हणून आमच्या मानेवर कुणीं गोणी ठेवलेल्या नाहींत, कीं या लेखाबद्दल चार पैसेसुद्धां मिळणार नाहींत. तरीपण लिहिल्याशिवाय राहवतच नाहीं. कां ? तर म्हणे, प्रवृत्ति-निवृत्तीची रस्सीखेंच, यंव् आणि त्यंव् ! अरे, लेखक म्हणून तुम्हांला मिरवायला पाहिजे, कीर्तीची हांव आहे, चार लोकांनीं बरं म्हटलेलं तुम्हांला हवं आहे ! कसली रस्सीखेंच नी कसलं काय ! ”

“ अस्सं, अस्सं. ” मी म्हणालों, “ चांगलाच सूड घेतलांत काका, तुमच्या नांवावर तत्त्वज्ञानाचा बकवा केल्याबद्दल ! ”

“ याची गोष्ट एक सोडून द्या, काका. ” माझा मित्र म्हणाला, “ हा असेल आपमतलबी तुम्ही म्हणतां तसा. पण मोठमोठे शास्त्रज्ञ, संशोधक, राजकारणी पुरुष, स्वत:च्या जीवाची पर्वा न करतां जें

९३००९

कार्य करून ठेवतात, तें काय कीर्तीच्या स्वार्थी आशेनं ? देश-कार्यासाठीं ऐहिक सुखावर लाथ मारणारे स्वातंत्र्यवीर, किंवा मानव-जातीच्या सुखांत भर घालणारा एखादा शोध लावण्यासाठीं सर्वस्वाचीच नव्हे, तर स्वतःच्या जीवाचीही राखरांगोळी करायला मागं-पुढं न पाहणारे शास्त्रज्ञ, हे कुठलंहि कार्य केवळ स्वार्थी हेतूनं करतात, असं मला नाहीं वाटत. साहित्यिकाची साहित्यनिर्मिती किंवा शास्त्रज्ञाचं संशोधन, कीर्ति किंवा नांव मिळविण्याच्या स्वार्थी लालसेनं केलीं जातात असं तुम्हांला वाटतं, तर तारे तोडणाऱ्या आमच्या या दोस्ताला कांहींतरी करावंसं वाटणं आणि कांहींच करूं नयेसं वाटणं, ही एक प्रवृत्तिनिवृत्तींची हेतुशून्य रस्सीखेंच, किंवा जीवन म्हणजे एक अर्थविहीन डोंबाऱ्याचा खेळ वाटतो.

मला वाटतं, मानवी अंतःकरणांत जगण्याची जशी एक प्रबळ इच्छा निसर्गानं ठेवून दिली आहे, तशीच निर्मितीची–स्वतःचं असं कांहीं तरी जगांत करून दाखविण्याची–बलवत्तर आवड उपजतच तिथं आहे. स्त्री-पुरुषांमधच्या आकर्षणाचा निसर्ग ज्याप्रमाणें मानवजातीचं सातत्य राखण्याकरितां उपयोग करून घेतो, त्याच-प्रमाणं मला वाटतं, या निर्मितीच्या आवडीचा फायदा घेऊन तो मानवीप्रगतीचं गाडं चालू ठेवतो ! स्वतःच्या सुखासाठीं म्हणून या आकर्षणामुळं स्त्री-पुरुष एकत्र येत असतील, पण मृत्युमुळं मानवजातींत पडणारी तूट जन्मानं भरून काढण्याचं कार्य निसर्ग परस्पर त्यांच्याकडून करून घेत असतो ! त्याचप्रमाणं शास्त्रज्ञ किंवा साहित्यिक या निर्मितीच्या नादानं कीर्तीसाठीं जिवापाड झटत असतील, पण मानवी सुधारणेंत, संस्कृतींत किंवा प्रगतींत अविरत भर घालण्याचं काम निसर्ग त्यांच्या हातून साधतो. या निर्मितीच्या नादांतच प्रगतीची किल्ली आहे."

माझ्या मित्राचें हें जोरदार व्याख्यान ऐकून गणूकाका तर सर्दच

झाले. पण मीही बराच चमकलों. मात्र त्याच्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे असें मला वाटतें. कीर्तीच्याच आशेनें मनुष्य एखादें चांगलें कार्य करतो असें म्हणता येणार नाहीं. आपल्या कार्याचा किंवा आपल्या नांवाचा जगाला मागमूसहि लागणार नाहीं, हें माहीत असूनहि सत्कार्य करीत राहणारे अज्ञात वीर काय थोडे आहेत ? पेटलेल्या खाईवर देहाचा पूल करून शिवाजीला पुढें जाऊं देणाऱ्या स्वामिनिष्ठ मावळ्यांनीं तें वीरकृत्य काय कीर्तीच्या आशेनें केलें ? कांहीं तरी चांगलें कार्य करण्याची अनावर इच्छा–निर्मितीचा नाद–हेंच त्याचें खरें कारण. यावरहि कदाचित् गणूकाका म्हणतील, कीं असलें कार्य करतांना होणाऱ्या आनंदाच्या स्वार्थी हेतूनें हे लोक असलीं कार्यें करीत असतील ! या प्रश्नाला मात्र माझ्याजवळ उत्तर नाहीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३६८४९ वि: निबंध-
क्रमांक १५०२ नों. दि. २५।८।६४

# १७ शब्दू करण्याची कला !

आमच्या गणूकाकांचे पुण्याला एक मित्र आहेत. त्यांचा कुणाशींहि कधींच मतभेद होत नाहीं; किंवा, खरें बोलायचें म्हणजे कुणाशीं मतभेद करण्याची त्यांची मुळीं इच्छाच नाहीं. परवां पुण्यांत स्टेशनच्या बाजूला घाईघाईनें जातांना मला ते दिसले. मीं त्यांना सहज म्हटलें, " काय अप्पा, मुंबईला चाललांत वाटतं ? " त्यावर अगदीं गोड चेहरा करून ते म्हणाले, " हो, तसं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. तसा आत्तां एका रेल्वेच्या अधिकाऱ्याला भेटायला चाललोंय्, पण दोन चार दिवसांनीं जाणार आहें मुंबईला मी ! "

म्हणजे त्या वेळेला ते मुंबईला चालले नव्हते. पण माझ्याशीं मतभेद करूं नये या सोज्वळ हेतूनें ते पहिल्यांदा 'हो, हो' म्हणाले; आणि नंतर हळूच आपण मुंबईला जात नसून रेल्वे अधिकाऱ्याला भेटायला जात आहोंत ही खरी परिस्थिति त्यांनीं भीत भीत मला सांगितली. पण एवढ्याशा मतभेदानेंसुद्धां माझें हळवें मन दुखावलें जाईल म्हणून त्यांनीं तीन चार दिवसांनीं आपण मुंबईला जाणार आहोंत असें खात्रीपूर्वक आश्वासन देऊन माझें सांत्वन केलें !

दुसऱ्याशीं सहमत होण्याची त्यांची विलक्षण तत्परता पाहून केव्हां केव्हां हंसतां हंसतां पोट दुखूं लागतें. एकदां बोलतां बोलतां गणूकाका रागानें त्यांना म्हणाले, " काय गाढव आहेस तूं, आप्पा! "

" हो, ' नाहीं ' नाहीं म्हणत मी; पण इतक्या मोठ्यानं माझ्या अंगावर ओरडूं नकोस बुवा! " ते गोरामोरा चेहरा करून म्हणाले.

या गृहस्थांच्या अगदीं उलट माझ्या एका मित्राचा स्वभाव आहे. प्रत्येक गोष्टींत दुसऱ्याशीं मतभेद करणें हें एक त्याला पवित्र कर्तव्य वाटतें. कुणी जर म्हटलें, कीं अमुक ठिकाण इथून पांच मिनिटांच्या रस्त्यावर आहे, तर तो ताबडतोब त्या माणसाला सांगेल, " छे छे, चुकतां तुम्ही; तिथं जायला साडेपांच मिनिटं लागतात ! "

कुणाला म्हणून सुखी वाटूं द्यायचं नाहीं असा जणूं काय त्याचा निश्चयच आहे. शत्रु करण्याच्या कलेंत तो इतका तरबेज झाला आहे, कीं हा एक त्याचा आतां स्वभावधर्मच होऊन बसला आहे. दुसऱ्याचीं मनें दुखावण्यांत आणि विनाकारण कुणाचीहि टोपी उडवण्यांत त्याला निरतिशय आनंद वाटतो. आपण दुसऱ्याचीं मनें दुखवतों आणि जिकडे तिकडे शत्रु निर्माण करतों याची मात्र त्याला कल्पनासुद्धां होत नाहीं.

सर्वांच्या टोप्या उडवून वर आणखी आपल्याशीं लोक नीट वागत नाहींत, आपणांला शत्रु फार आहेत, आपणांला कुणी चांगलें म्हणत नाहीं, याबद्दल तो कुरकुर करतो. मला त्याच्या या कुरकुरीचें आश्चर्य वाटतें. तसें त्याला मीं स्पष्ट सांगितलेंहि. मीं म्हटलें, " इतरांनीं तुला चांगलं म्हणावं असं तुला वाटतं— दुसऱ्यांनीं चांगलं म्हटलं कीं तुला सुख होतं; मग इतरांनाहि तुझ्यासारखंच वाटत असेल याचा मात्र तूं चुकूनसुद्धां विचार कां करीत नाहींस ? इतरांकडून चांगलं म्हणवून घेण्यांत तुला जर सुख

वाटतं, तर तूंहि इतरांना चांगलं म्हटलं पाहिजेस." त्याला हें पटतें, पण त्याचा स्वभाव कांहीं जात नाहीं.

मीं या गोष्टींचा विचार करूं लागलों, कीं अप्पांच्या वरवर हास्यास्पद दिसणाऱ्या वागणुकीचें मर्म मला थोडें थोडें कळूं लागतें. आपणांला कुणी चांगलें म्हटलें नाहीं, किंवा आपणाविषयीं कुणी वाईट मत प्रदर्शित केलें, कीं त्यांना अत्यंत दुःख होत असावें. तेव्हां आपण कुणाला वाईट म्हणायचें नाहीं म्हणजे लोक आपणांला दुःख देणार नाहींत, या आशेनें सर्वांशीं सहमत होण्याचा आणि दुसऱ्यांचीं मनें न दुखविण्याचा त्यांनीं निश्चय केला असावा.

आप्पा किंवा माझा तो मित्र हे माझ्या मतें दोन आत्यंतिक नमुने आहेत. मी या दोहोंमधला सुवर्णमध्य साधायचा प्रयत्न करतों. मला कुणी चांगलें म्हटलें कीं बरें वाटतें, आणि वाईट म्हटलें कीं वाईट वाटतें, हें मीं माझ्या मनाशीं स्पष्ट केलें आहे. तेव्हां शक्य तों दुसऱ्यांना चांगलें म्हणायचें,–सहसा कुणाला वाईट म्हणायचें नाहीं, आणि अशा तऱ्हेनें आपणांला वाईट म्हणून आपल्या आयुष्यांतले कांहीं क्षण दुःखीकष्टी करणारे शत्रु निर्माण करायचे नाहींत, असा माझा नियम आहे. कठोरपणें मतभेद व्यक्त केल्यामुळें एखाद्याचें चांगलें होणार असेल, किंवा कटु सत्य स्पष्टपणें न बोलल्यामुळें जगाचा मोठा तोटा होणार असेल तरच एखाद्याचें मन दुखवावें असें मला वाटतें. इतकेंहि करून कुणी माझ्याशीं शत्रुत्व करूं लागला तर मात्र सर्व शक्ति एकवटून त्याच्याशीं झटापट करायला आणि शक्यतों त्याला चारी मुंड्या चीत करून विजयोत्साहाचा आनंद उपभोगायला मी मागेंपुढें पाहाणार नाहीं !

माझें हें तत्त्वज्ञान मी जेव्हां माझ्या मित्रांना सांगतों, तेव्हां त्यांच्यापैकीं कांहीं मला चिडविण्याकरितां म्हणतात, " किती थोर मन तुझं ! पुढं मागं तूं महात्मा होणार ! "

यावर माझें उत्तर ठरलेलें आहे; " माझ्या या तत्त्वज्ञानांत थोरपणा किंवा मनाचा मोठेपणा कांहीं एक नाहीं, हें मी कबूल करतों. माझा हा अगदीं उघडा नागडा स्वार्थ आहे. मी म्हणतों, उगाच शत्रु निर्माण करून आपल्या आयुष्यांतले कांहीं क्षण तरी दु:खीकष्टी कां करा ? "

## १६ तत्त्वनिष्ठा आणि तमासगीर

मुद्देमालासह एखाद्या चोराला पकडतांना पोलिसाला जसा आनंद होतो तसा त्या दिवशीं गणूकाकांना झाला. ते माझ्या खोलींत शिरले तेव्हां माझ्या ओळखीचा एक हस्तसामुद्रिक माझा हात पाहात बसला होता. मला चकित करून टाकतील अशा एक दोन गोष्टी त्या सामुद्रिकानें सांगितल्यामुळें मीहि त्याचें बोलणें एकाग्र चित्तानें ऐकत होतों. 'आतां सांपडलास, जातोस कुठें !' अशा मुद्रेनें चष्म्याच्या भिंगावरून माझ्याकडे पाहात उंदरावर झडप घालूं पाहणाऱ्या 'बोक्याच्या पवित्र्यांत 'गणूकाका बसले होते. तो सामुद्रिक दाराच्या बाहेर पडला मात्र आणि गणू-काकांनीं माझ्यावर झडप घातली.

" कां हो, भौतिकतावादी, नवमतवादी, पुरोगामी ! तुमचा या शास्त्रावर कधींपासून विश्वास बसला ? आम्ही जुने लोक उघड-पणें या शास्त्रावर आमचा विश्वास आहे असं कबूल करतों म्हणून आम्ही चोर, आणि तुम्ही चोरून हात दाखवतां म्हणून तुम्ही साव काय रे ?"

"कोण चोरून हात दाखवतो आहे ? " मी म्हणालों, " मी

तर उघडयावर हात दाखवीत बसलो होतों. चोरून दाखवायचा असता तर कडी लावून घेतली असती; आणि तुम्हांलासुद्धां आंत घेतलं नसतं. आणि पुन्हां असं पाहा. ज्योतिषशास्त्रावर किंवा हस्त-सामुद्रिकावर तुमचा विश्वास आहे म्हणून आम्ही तुम्हांला कधीं चोर म्हटलं होतं, किंवा शिव्या दिल्या होत्या ? "

" पण तुम्ही भौतिकतावादी, पुरोगामी हीं सर्व शास्त्रं झूट आहेत असं म्हणतां ना ? "

" हो. म्हणतों आणि म्हणणार ! " मी शांतपणें म्हणालों.

" आणि तरीहि आपले हात मात्र दाखवणार. " गणूकाका चिडून ओरडले, " चोर कुठले ! "

" हें पहा काका, तुमच्यांत आणि आमच्यांत फरक हा, " मी म्हणालों, " कीं तुम्हांला एखादी गोष्ट नकोशी किंवा अनिष्ट वाटली, कीं ती जगांत नाहींच असं तुम्ही धरून चालतां; तिचा विचारसुद्धां करायला तुम्ही तयार नसतां. शहामृग ज्याप्रमाणं वाळवंटांत आपलं डोकं खुपसतो आणि जग बुडालं असं समजतो तसं तुमचं आहे. आमचं तसं नाहीं. आम्हांला नको असलेल्या— आमच्या विरुद्ध असलेल्या गोष्टींचासुद्धां सर्व बाजूंनीं विचार करा-यला आणि त्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहायला आम्ही तयार असतों. तुमचं ज्योतिषशास्त्र किंवा सामुद्रिक शास्त्र इतर भौतिक शास्त्रांप्रमाणं एक शास्त्र आहे असं तुमच्याप्रमाणं आम्हाला वाटत नसेल, पण त्यांतल्या एक दोन गोष्टी आम्हांला पटल्या तर त्यांत तथ्य तरी किती आहे, हें समजावून घ्यायला आम्ही केव्हांहि तयार असतों. यालाच शास्त्रीय दृष्टिकोन म्हणतात. तो आमच्यांत आहे आणि तुमच्यांत नाहीं ! "

" निर्लज्ज आहांत तुम्ही लोक ! " असें कांहीं तरी पुटपुटत गणूकाका निघून गेले !

गणूकाकांच्या पुढें तत्त्ववेत्त्याचा मोठा आव मीं आणला खरा पण माझ्यावर विनाकारण तत्त्वच्युतीचा आरोप केल्याबद्दल खरोखरच मला त्यांचा मनापासून राग आला होता. अर्थात् गणूकाका थोर मनाचे आहेत, आणि केवळ वितंडवाद करीत बसण्याची जन्मजात खोड असल्यामुळें ते माझ्याशीं वाद घालतात ही गोष्ट वेगळी. पण तत्त्वनिष्ठा आणि तत्त्वच्युति यांबद्दल बऱ्याचशा लोकांच्या कांहीं तरी चमत्कारिक कल्पना आहेत खऱ्या. त्यांच्या मतें एखाद्यानें भौतिकतावादाचा म्हणा, साम्य-वादाचा म्हणा, किंवा कसल्याहि तत्त्वज्ञानाचा म्हणा, एकदां स्वीकार केला, कीं दुसऱ्या कुठल्याहि तत्त्वज्ञानाकडे डोळे उघडून पाहातां कामा नये, किंवा त्यासंबंधीं कान उघडे ठेवून कांहीं ऐकतां कामा नये. अशा तऱ्हेनें ज्ञानसंपादनाचे सर्व मार्ग बंद करून स्वतःचा शिलास्थि बनविणें म्हणजे खरी तत्त्वनिष्ठा ! हे लोक एक साधी गोष्ट विसरतात, कीं तत्त्वज्ञानाकरितां कुणी तत्त्व-ज्ञानाचा स्वीकार करीत नसतो; जीवनांतलें कांहीं तरी उदात्त ध्येय साधण्याकरितां कुणीही एखाद्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करतो. तत्त्वज्ञान हें साधन. ध्येय हें साध्य तें एखादा भौतिकतावादी ज्योतिषशास्त्रावर विसंबून स्वतःच्या आयुष्याचा आराखडा आंखील किंवा दुसऱ्याला आंखायला सांगेल, तर तोंडानें भौतिकतावादाच्या गप्पा करीत कृतींत दैववाद आचरल्याबद्दल त्याला तत्त्वच्युत म्हणतां येईल; पण जोतिषशास्त्र काय आहे हें समजावून घेण्याचा प्रयत्न करणें, किंवा त्यांतली एखादी गोष्ट पटली तर ती पटली असें कबूल करणें म्हणजे खास तत्त्वच्युति नव्हे.

एखाद्यानें आपलें साध्य कितपत साधलें आहे हें न पाहतां तो आपल्या तत्त्वज्ञानांतल्या अक्षरांना कितपत चिकटून राहिला आहे हें पाहणाऱ्या टीकाकारांची मनोवृत्ति मात्र मला पूर्णपणें समजतें.

कुणी पडो अगर कुणी चढो; जगाचें बरें होवो अगर वाईट होवो, आपणाला थोडी गंमत पाहायला मिळते ना, ही तमासगिराची वृत्ति टोकाकारांची असते. एखाद्या साम्यवाद्यानें विशिष्ट परिस्थितींत एखाद्या भांडवलवाल्याशीं तडजोड केली, कीं हे रिकामटेकडे तमासगीर तो तत्त्वच्युत झाला म्हणून त्याच्या विरुद्ध एकच गिल्ला करतात. साहाजिकच आहे. तडजोड न होतां तो साम्यवादी त्या भांडवलवाल्यांकडून हकनाहक चिरडला गेला असता म्हणजे चार दिवस या तमासगिरांना मजा पाहतां आली असती ! अर्थात् तडजोड न केल्यामुळें साम्यवादाचा फायदा होणार असता, किंवा भांडवलशाहीला धक्का बसणार असता तर ती तडजोड करणारावर तत्त्वच्युतीचा आरोप खात्रीनें करतां येईल. पण ज्या तडजोडीमुळें भांडवलवाल्याचा कांहीं एक फायदा न होतां तो साम्यवादी जिवंत राहून त्या भांडवलवाल्याचें अधिक नुकसान करूं शकतो, ती तडजोड तत्त्वनिष्ठेला मुळीच बाधक नाहीं. या तमासगिरांच्या टाळ्या मिळविण्याकरितां किंवा ‘ हुतात्मा ’ म्हणून स्वतःचे जयजयकार करून घेण्याकरितां साध्यावर तिलांजली देऊन शत्रूच्या जाळयांत चालत जाणारे खुळे तत्त्वनिष्ठ पुष्कळ असतात. खऱ्या तत्त्वनिष्ठ माणसानें या तमासगिरांना खूष करण्याच्या भानगडींत न पडता साध्यावर नजर ठेवून आपल्या तत्त्वांचें पालन करावें हेंच बरें.

# १७ चांगुलपणाचे तोटे !

मी कांहीं तरी लिहीत बसलों होतों, इतक्यांत गणूकाका आंत आले.

" काय, नेहमींप्रमाणं आपल्या अकलेचे तारे तोडीत बसलाय्स कीं काय ?" स्वतःच्या कोटीवर स्वतः खूष होऊन काका म्हणाले.

" काय, माझ्या लिखाणाला काय वाटेल ते नांव ठेवा. " मी म्हणालों, " आतांपर्यंत इतकं भिकार लिखाण कुणीं लिहिलं नसेल असं म्हणा पाहिजे तर, पण तेवढी अकलेचे तारे तोडण्यासंबंधीं कोटी करूं नका, बुवा !"

" कां ? त्या कोटीमुळं अगदीं मर्मभेद झाला का तुझा ?" काका म्हणाले.

" छे छे, " मीं म्हणालों, " म्हणतों ना, कीं मला काय वाटेल तें म्हणा पण तेवढी कोटी करूं नका ! तुमचा अधःपात मला पाहवत नाहीं !"

" माझा अधःपात ? " काका डोकीवरील रुमाल सांवरीत उद्गारले.

" हो, अधःपात ! " मी म्हणालों, " अहो, हे लेख लिहितांना

जी कोटी मीं कित्येक वेळां स्वतःच्या विरुद्ध स्वतःच केली आहे, तिचाच तुम्हीं पुनरुच्चार करावा, हा अधःपात नाहीं तर काय ? तुमच्यासारख्या मोठ्या माणसानं माझ्यासारख्या सामान्य माणसाचं उच्छिष्ट उचलावं हें खरोखरच मला बघवत नाहीं ! "

माझा युक्तिवाद ऐकून काका सर्दच झाले. पुन्हां ते असल्या शिळ्या कोट्या करण्याच्या भानगडींत पडतील असें मला वाटत नाहीं. अर्थात् गणूकाका असल्या गोष्टी निव्वळ भोळेपणामुळें करतात. पण सर्वच माणसें मात्र अशीं भोळीं नसतात. स्वतःचा कमीपणा कबूल करण्याचा एखाद्यानें भलेपणा दाखवला, तर ताबडतोब त्याचा फायदा घेऊन त्याच्यावरच कुरघोडी करण्याचा हे लोक प्रयत्न करतात. मी हे अकलेचे तारे तोडले आहेत—यांत कांहीं तथ्य असेल तर पाहा, असें म्हणणाऱ्याला त्याच्याच शब्दाचा आधार घेऊन बेअकली ठरविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे स्वतःच्या अकलेचें दिवाळें वाजल्याचें जाहीर करण्यासारखें आहे. एखाद्यानें तुमच्यावर विश्वास टाकून केवळ भलेपणामुळें दिलेल्या कबुलीजबाबाचा त्याच्याविरुद्ध उपयोग करणें, हा माझ्या मतें मनाचा हलकेपणा होय.

केवळ वादांत विजय मिळविण्याकरितां प्रतिपक्षाच्या चांगुलपणाचा त्याच्याच तंगड्या तोडण्याकरितां उपयोग करणें यांत मनाचा हलकेपणा असला तरी ती एक क्षुल्लक बाब झाली. पण दुसऱ्याच्या चांगुलपणाचा भरपूर फायदा घेऊन वर तो आणखी चांगुलपणा दाखवीत नाहीं म्हणून सात्त्विक संतापानें तक्रार करणारे हरीचे लालहि मीं पाहिले आहेत ! माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाला फिल्म कंपनी काढण्याकरितां त्याच्या एका उदार मित्रानें पन्नास हजार रुपये दिले. त्या पन्नास हजार रुपयांची चटणी करून आणखी दहा हजार तो आपल्या मित्राकडे मागूं

लागला. त्यानें, नाहीं ' म्हटलें तेव्हां संतापानें फणफणत हा गृहस्थ मला सांगू लागला, " काय विश्वासघातकी माणूस आहे ! आतां दहा हजार त्यानं दिले असते तर गेलेले पन्नास हजार तर मिळालेच असते, पण आणखी वीस हजार फायदा झाला असता. आयत्या वेळीं हरामखोरानं गळा कापलान् माझा ! "

" अस्सं होय ? " मी म्हणालों, " पण कदाचित् त्याचे साठ हजार गेले असते."

" मग, गेले तर गेले,—काय थोडा पैसा पडलाय् त्याच्याजवळ ? " तो दुखावलेला हुतात्मा कळवळून उद्‌गारला. त्याचे हे उद्‌गार ऐकून मी थक्क झालों.

खरेंच. मानवी मनाचें काय हें औदार्य !—स्वत:खेरीज इतर सर्व चांगले असावेत असें प्रत्येक माणसाला वाटतें !

# १८ ही पाहा संस्कृति !

'तुम्ही सुंदर आहां !' या शब्दांनीं एखाद्या स्त्रीच्या सौंदर्याला एखाद्या पुरुषानं प्रशस्तिपत्र दिलं, तर तिला बरं वाटतं; पण तेंच एखाद्यानं नुसत्या डोळ्यांनीं दिलं तर तिला राग येतो. या गोष्टीचं मला राहून राहून आश्चर्य वाटतं. एखादा पुरुष एखाद्या स्त्रीकडे मुद्दाम पाहतो तेव्हां तिच्यांत कांहीं तरी पाहण्यासारखं आहे, ती सुंदर आहे हें तो एक प्रकारें कबूल करीत असतो. पण स्त्रियांना ही गोष्ट आवडत नाहीं. जुन्या, कर्मठ स्त्रियांची गोष्टच सोडा, पण चांगल्या आधुनिक, चारचौघांत मिसळणाऱ्या, खेळाडू वृत्तीच्या तरुण स्त्रियाहि 'अमका माझ्याकडे पाहतो; तमका मला न्याहाळतो !' अशा प्रकारच्या तक्रारी करीत असलेल्या आढळतात.

माझ्या माहितींतली एक मुलगी नेहमीं अशा तक्रारी करीत असे. एके दिवशीं मीं तिला चांगलाच जबाब दिला.

"माझ्या वर्गातला अमुक अमुक मुलगा एकसारखा माझ्याकडे पाहतो." ती म्हणाली.

"नशीब तुझं," मीं म्हटलं, "त्याचे आभार मान ! आमच्या-

कडे कुणी पाहात नाहीं म्हणून आम्ही दु:खी-कष्टी होतों; आणि तुझ्याकडे लोक पाहतात म्हणून तूं रडतेस. काय मनुष्य-स्वभाव आहे !"

"थट्टा काय करतां ?' ती म्हणाली, 'तो मुलगा फार वाईट आहे."

"तुझ्याकडे तो नुसता पाहतो आहे तोंपर्यंत त्याच्यांत कांहीं वाईट आहे, असं मला मुळींच वाटत नाहीं. तुझ्यांत कांहीं तरी पाहण्यासारखं आहे,–तरुण आहेस, सुंदर आहेस तोंपर्यंत लोक तुझ्याकडे पाहताहेत तरी; आणखी पांच-दहा वर्षांनीं तूं पैसे देऊन पाहा म्हटलंस तरी कुणी पाहणार नाहीं ! जा घरीं, आणि फारच त्रास होत असेल तर बुरखा घेऊन फिरत जा !"

माझी खात्री आहे कीं लोक आपल्याकडे पाहतात याचा मनांतून तिला आनंद होत होता; पण बाहेरून ती उगाच कांगावा करीत होती. याचं कारण अगदीं उघड आहे. पुरुषांनीं आपणांकडे पाहिलं कीं आपणाला आनंद होतो, असं आपण दाखवलं तर लोक आपणांला वाईट म्हणतील. तेव्हां दुसऱ्यालाच अगोदर वाईट ठरवून टाका ! युद्ध-शास्त्रांतला जो नियम आहे कीं, 'आक्रमण हेंच उत्तम आत्मरक्षण !' तोच नियम स्त्रिया पाळीत असाव्या !

मात्र माझं हें तत्त्वज्ञान माझ्या एका मैत्रिणीला मीं तावातावानं सांगत असतां तिनं माझे चांगलेच कान उपटले. तिच्या म्हणण्यांत बरंच तथ्य होतं, आणि मला तें पटलंहि.

"पुरुषजातीचे एक महान् कैवारी म्हणून मी तुमचं अभिनंदन करतें," ती म्हणाली, "जरा कुणीं पाह्यलं कीं 'इश्श' 'इश्श' म्हणून नाक उडवणाऱ्या कांहीं स्त्रिया तुम्ही म्हणतां त्या प्रकारच्या असतील, आणि एखाद्या चांगल्या पुरुषानं आमच्याकडे पाहिलं तर आम्हांला बरं वाटतं, हेंहि मी कबूल करतें; पण एखादा

मनुष्य तुमच्याकडे एकसारखा पाहायला लागला,–मग त्याचे हेतु कांहीहि असोत, तुम्हांला कसंसंच वाटतं कीं नाहीं ?"

"हो, वाटतं ना," मी म्हणालों.

"झालं तर," ती म्हणाली, "कणखर मनाच्या तुम्हां पुरुषांना जर कसंसंच वाटतं, तर आम्हां बायकांना थोडं कसंसंच वाटलं तर तुम्हांला नवल कां हो वाटतं ? दुसऱ्याला कसंसंच वाटायला लावणं बरं का ?"

"कबूल आहे, बुवा !" मी उद्गारलों.

कबूल केल्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतं; कारण पुरुषांनीं बायकांनाच काय पण कुणीं कुणालाच कधींहि कसंसंच वाटायला लावूं नये, असं मला वाटतं. माणसाच्या संस्कृतीची माझी मुळीं व्याख्याच अशी आहे. आपल्या बोलण्यानं, चालण्यानं, वागण्यानं कुणाला कधींहि कसंसंच वाटूं न देणं म्हणजेच संस्कृति ! आणि ही संस्कृति नुसतीं पुस्तकं वाचून, पदव्या घेऊन किंवा जगभर प्रवास करून येतेच, असं नाहीं. मनाचीच तशी घडण असावी लागते, असं मला वाटतं. म्हणूनच गणूकाका फारसे शिकलेले नाहींत, फार कुठं फिरलेले नाहींत, तरी पण गणूकाकांना मी माझ्यापेक्षां किती तरी अधिक सुसंस्कृत समजतों. एकच उदाहरण देतों. गणूकाकांना मीं एक कांचेची सुंदर फुलदाणी दिली होती. एकदां मी, काका आणि दुसरा एक गृहस्थ काकांच्या खोलींत कांहीं तरी गप्पा करीत बसलों होतों. तो हातवारे करून कांहीं तरी सांगत होता; त्याचा चुकून त्या फुलदाणीला हात लागला, आणि ती खालीं पडून तिचे तुकडे तुकडे झाले. थोडाच वेळ कां होईना, पण ती सुंदर फुलदाणी फोडल्याबद्दल मला त्या गृहस्थाचा राग आला. मी कांहीं बोललों नाहीं तरी पण माझ्या चेहऱ्यावर नापसंतीच्या रेषा खात्रीनं उमटून गेल्या असणार. कांहींच झालं

नाहीं, असं मोठ्या प्रयासानं मीं दाखवलं. त्या गृहस्थाचं माझ्या चेहऱ्याकडे लक्ष गेलं असतं तर त्याला कसंसंच वाटलं असतं. त्यानं पाह्यलं नाहीं, ही गोष्ट वेगळीं. पण त्या वेळीं काका किती सहजपणं वागले. त्या गृहस्थाच्या तोंडून कांहीं दिलगिरीचे शब्द बाहेर पडायच्या आंतच काका एकदम म्हणाले,

" अहो. त्यांत कांहीं नाहीं. त्या शेजारच्या बंडूनं कालच तिचे दोन तुकडे केले होते. टाकून देण्याऐवजीं मीं आपले जुळवून ठेवले होते. तुम्ही उगाच निमित्त झालांत, एवढंच. ते तुकडे मीं टाकायला पाहिजे होते !"

त्या गृहस्थाच्या मनावरचं ओझं एकदम उतरलेलं दिसलं.

तो निघून गेल्यावर मीं काकांना म्हटलं, " ते फुटके तुकडे उगाच कशाला जुळवून ठेवले होतेत, काका ?"

"अरे, कुठं फुटले होते ? चांगली धड होती ती !"

" म्हणजे !"

" एकदां फुटली ती पुन्हा का सांधणार होती ? त्या बिचाऱ्याला वर आणखी वाईट वाटायला कशाला लावायचं ?"

मी थक्क झालों. काकांचा मला अभिमान वाटला. मात्र काकांच्या सुसंस्कृतपणाविषयीं मला काय वाटतं तें मी त्यांच्या तोंडावर कधींच बोललों नाहीं आणि बोलणारहि नाहीं; कारण माझ्याच शब्दांचा आधार घेऊन ते माझ्या डोक्यावर चढून बसायचे आणि मला पदोपदीं हिणवायचे !

# १९ पुराणांतलीं वांगीं

गणूकाकांशीं माझे मतभेद नेहमींच होतात, पण त्यांच्या एका शक्तीचं मला नेहमीं कौतुक वाटतं. कोणत्याहि कूट प्रश्नाचं ते अगदीं सहज आणि चट्दिशीं उत्तर देऊं शकतात. लहानपणीं तर त्यांच्या या शक्तीमुळं मी थक्क होऊन जात असें. त्या वेळीं मला जर कुणीं प्रश्न विचारला असता, कीं जगांतल्या सर्व शहाण्यांचा राजा कोण, तर त्याचं मीं तत्काळ उत्तर दिलं असतं, "गणूकाका– आमचे गणूकाकाच !"

लहानपणीं एकदां मीं त्यांना विचारलं, 'काका, मारवाड्याच्या डोक्यावर तीन पट्टे कां हो असतात ?'

काका ताबडतोब उत्तरले, "अरे, मारुतीनं ओढलेत ते त्यांच्या डोक्यांवर !"

"म्हणजे ?" मी उद्गारलों.

"मारुतीनं लंका जाळली हें तुला माहीत आहे ना ?"

"हो, पण त्याचा मारवाड्यांच्या..."

"ऐकून तर घे," काका सांगूं लागले, "शेपूट पेटविण्याकरितां त्यानं शेपटाला खूपशा चिंध्या गुंडाळल्या, आणि घासलेटचे डबे तो

शोधूं लागला. मारवाडी व्यापाऱ्यांकडे गयावया करून तो घासलेट मागूं लागला, पण मारवाडी कसले खप्पी; ते म्हणाले, 'आम्ही नाहीं देणार फुकट घासलेट.' मारुति संतापला. भुभु:कार करून त्यानं त्यांचीं गुदामं फोडलीं, घासलेटचे डबे बाहेर काढले आणि त्यांत शेपूट बुडवून पेटवून दिलं. त्या पेटत्या शेपटानं आधीं प्रत्येक मारवाड्याच्या डोक्यावर त्यानं तीन तीन पट्टे ओढले, आणि मग लंकेला आग लावायला तो निघाला. तेव्हांपासून मारवाड्यांच्या डोक्यांवर हे तीन पट्टे आहेत !"

काकांनीं दिलेली ही माहिती ऐकून मी अगदीं खूष होऊन गेलों. त्या वेळेला तरी माझं पूर्ण समाधान झालं.

आतां मोठा झाल्यावर काकांच्या उत्तरांवर मी इतका बेफाम विश्वास ठेवीत नाहीं; तरी पण काकांच्या विशाल कल्पनाशक्तीचं मला अजूनहि पूर्वींइतकंच कौतुक वाटतं. परवां मीं त्यांना सहज म्हटलं, "का हो, काका, पण-बीण, बाप-बीप असं केव्हां केव्हां आपण म्हणतों, त्यांतले हें बीण आणि बीप शब्द कुठून हो आले ?"

काकांचं उत्तर तयारच होतं. ते म्हणाले, "देव विश्वामित्राचं ऐकेना, तेव्हां तपश्चर्या करून प्रतिसृष्टि निर्माण करायची धमकी विश्वामित्रानं देवाला दिली होती, तुला माहीत आहे ना ?"

मी म्हटलं, "हो."

"पुढं देव नमला आणि विश्वामित्रानं आपला तो विचार सोडून दिला," काका सांगूं लागले, "पण थोडीशी प्रतिसृष्टि निर्माण झालीच होती, त्या सृष्टींतले हे शब्द अजून आपल्या भाषेंत राहिलेत !"

विश्वामित्राची प्रतिसृष्टि आणि प्रतिसृष्टींतले हे शब्द, ही काकांची कल्पना मला अतिशयच हृद्य वाटली. हृद्य वाटायचं एक

विशेष कारण होतं, माझ्या डोक्यांत अलीकडे एक चमत्कारिक विचार सारखा घोळत असतो. पुराणांतलीं वांगीं पुराणांत असं म्हणतात खरं, पण पुराणांतल्या वांग्यांचं चांगलं चमचमीत भरीत करून खातां येईल, असं अलीकडल्या कांहीं शोधांवरून मला वाटूं लागलं आहे. ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र, वगैरे अस्त्रांचीं वर्णनं आम्ही पुराणांत वाचीत होतों. आणि तीं अस्त्रं सोडल्याबरोबर पृथ्वी कशी थरथरा कांपत होती, सप्तसागर कसे उफाळून वर येत होते, आकाश कसं कोसळून खालीं येत होतं, भर दिवसां मिट्ट अंधःकार कसा होत होता आणि मध्यरात्रीं लख्ख प्रकाश कसा पडत होता वगैरे वगैरे गोष्टींचं आम्हांला विलक्षण आश्चर्य वाटत होतं. हें आपलं पुराणांतलं वर्णन आहे. वास्तव जगांत हें कांहीं शक्य नाहीं. अशी आमची खात्री होती. ॲटम् बॉंबचीं आणि त्याच्या स्फोटांचीं वर्णनं वाचन हीं पुराणांतलीं वांगीं आतां डोळ्यांसमोर झाडांना लटकूं लागलीं आहेत.

मध्यरात्रीं सामसूम झाल्यावर मी रेडिओ लावून बसतों, तेव्हां विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीची मला पुन्हां पुन्हां आठवण होते. एखाद्या वेळीं तुर्कस्थानमधील अंकारा शहरांत कुणी बोलत असेल त्याचा आवाज ऐकूं येतो, तर कधीं ऑस्ट्रेलियांतील सिडने-मधले शब्द कानांवर पडतात. कुठं तुर्कस्थान ! कुठं ऑस्ट्रेलिया ! त्या बोलणारांना कल्पना तरी असेल का, कीं मुंबई नांवाच्या एका शहरांतल्या एका कोपऱ्यांत बसलेल्या एका माणसाच्या कानांवर आपण बोलत असलेले शब्द पडत असतील म्हणून ? आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द त्याच क्षणाला साऱ्या विश्वाच्या कोना-कोपऱ्यांत जातो,—हिमालयावर उड्डाण करीत असलेल्या एखाद्या विमानांत, पॅसिफिक महासागराच्या तळाशीं असलेल्या एखाद्या पाणबुडींत, आफ्रिकेंतल्या जंगलांत, न्यूयॉर्कमधील गगनचुंबी इम-

त्याच्या एकशें दहाव्या मजल्यावर तो टिपून घेणारें यंत्र असेल तर तो ऐकतां येईल हें खरं, पण ऐकूं येवो अगर न येवो, तो इतक्या दूर सर्व ठिकाणीं जातो हें केवढं महान् आश्चर्य आहे !

रात्रीच्या प्रशांत वेळीं या आश्चर्याचा विचार करीत असतां कल्पनाशक्तीला आणखी एक पाऊल पुढें टाकावंसं वाटतं. साऱ्या विश्वाला वेढून टाकणाऱ्या लहरी आमचे शब्द सर्वत्र नेतात हें जर खरं, तर आणखीहि एक गोष्ट खरी असण्याचा संभव आहे. या लहरी हे शब्द सांठवूनहि ठेवूं शकत असतील. विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीसारखीच, कुणीं सांगावं, एखादी आवाजाची दुनिया असेल. आजचे, कालचे अनादिकालापासूनचे माणसांचे आवाज या दुनियेंत वावरत असतील; उद्यां एखादा शास्त्रज्ञ या लहरीचं एखादं नवं रहस्य उघडकीला आणील, या 'आवाजाच्या दुनिये'चीं दारं आपणांसाठीं खुलीं होतील. आणि मग ?––मग कल्पना करावी तितकी थोडीच ! कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णानं अर्जुनाला सांगितलेली गीता, प्रत्यक्ष त्याच्या शब्दांत आपणांला ऐकता येईल; भगवान् बुद्धाचीं प्रवचनं त्याच्या आवाजांत आपण ऐकूं. डेमॉस्थेनिस, सिसेरोचीं भाषणं, शिवाजीचे शब्द, काय काय आपणांला ऐकतां येईल. मात्र व्याख्यानांचे खोटे रिपोर्ट देणं अशक्य होईल. सिनेमाला नेईन असं मी काल म्हणालोंच नव्हतों म्हणून नवऱ्यांना बायकांशीं भांडतां येणार, नाहीं. आणखी, आणखी पुष्कळच कांहीं होईल ! पुराणांतलीं वांगीं पुराणांत असं गणूकाकांना सांगण्याची कांहीं सोय उरलेली नाहीं, एवढं खरं.

(राज्य) ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६७४९ वि: निबंध
क्रमांक १५०२ नों: दि: २५।८।६२

## १० काय हा योगायोग !

कोणतीहि गोष्ट सांगतांना गणूकाका मुळीं सुरुवातच 'योगायोग काय पाहा' अशी करतात ! जगांत जें कांहीं घडत तें सर्वच योगायोगामुळें घडतं असं त्यांचं ठाम मत आहे. सर्व कांहीं कर्ता-करविता ईश्वर आहे अशी त्यांची बालंबाल खात्री असल्यामुळे, जें जें कांहीं होतं तें त्याच्या इच्छेनंच होतं असं त्यांना वाटतं आणि ते म्हणतात, 'तसा योगायोगच होता मुळीं !' पण असं म्हणतांना आपण एक वदतोव्याघात करतों आहोंत–एकाच वेळीं एकमेकांना रद्दबातल करून टाकणारीं विधानं करतों आहोंत, हें त्यांच्या ध्यानीं येत नाहीं. योगायोग असं आपण केव्हां म्हणतों ? जेव्हां त्या त्या घटनेचं तर्कशुद्ध कारण देतां येत नाहीं तेव्हां,–जेव्हा असं कां घडलं तें सांगतां येत नाहीं तेव्हां. असं जर आहे, तर मग परमेश्वराच्या इच्छेमुळें अमुक अमुक घडलं असं स्पष्ट कारण दिल्यावर त्यांत योगायोग तो काय उरला ?

गणूकाकांच्यासारखे जे निर्भेळ देववादी किंवा दैववादी आहेत त्यांची गोष्ट सोडा. जगांतल्या बऱ्याचशा गोष्टींची कारणमीमांसा करतां येते, बहुतेक कार्यांचं कारण दाखवून कार्यकारणभाव

प्रस्थापित करतां येतो. म्हणूनच एखाद्या घटनेची कारणमीमांसा करतां आली नाहीं किंवा अगदींच क्षुल्लक कारणानें कांहीं तरी प्रचंड कार्य घडलं म्हणजे आपण ‘ काय बुवा योगायोग तरी ! ’ असं कांहीं तरी उद्गारतों ! अनपेक्षितपणें किंवा कल्पना नसतांना एखादी चांगली गोष्ट घडली म्हणजे ‘ योगायोग ’ हा शब्द वापरतों; तशाच परिस्थितींत पण वाईट गोष्ट घडली म्हणजे ‘ दैवगति ’ असं म्हणतों. दैवगति हाहि एक योगायोगाचाच प्रकार, दुसरं काय ?

एखाद्या दिवशीं आपण एखाद्या मित्राला भेटायला जावं असा विचार मनांत आणतों, तोंच तो मित्र दत्त म्हणून दाराशीं येऊन उभा राहतो, किंवा एखादा गरीब कारकून आपणांला कधीं इंग्लंड-अमेरिका पाहायला मिळेल का असं सुखस्वप्न मनांत घोळवीत असतो आणि सर्वांना सोडून, त्यालाच एखाद्या दिवशीं साहेब विचारतो, माझ्याबरोबर तूं विलायतेला येतोस का ?–मला एका कारकुनाची फार जरुरी आहे !–हे झाले योगायोग.

दैवगतीच्या किंवा वाईट योगायोगाच्याहि अशा कांहीं नेहमींच्या अनुभवांतल्या गोष्टी सांगतां येतील. मला एका वैमानिकाची गोष्ट माहीत आहे. त्याचा एक जोडीदार आजारी पडला. त्याची जागा घेण्याची पाळी दुसऱ्याचीच होती. तो जायला तयारहि झाला. पण हा तरुण आपली पाळी नसतांनाहि पुढें होऊन म्हणाला, ‘ मी जातों, तूं घे स्वस्थ विश्रांति. ’ आणि त्याच दिवशीं विमानाला अपघात होऊन तो त्यांत ठार झाला. जणुं काय, मृत्यूशीं त्याचा संकेत–अपॉइन्टमेंट ठरली होती. आणि ती पाळल्याशिवाय त्याला राहवत नव्हतं. ‘ तुकाराम ’ बोट बुडाली, त्या वेळची अशीच एक गोष्ट मीं ऐकली आहे. दोन्ही प्रकारचे योगायोग त्या गोष्टींत आहेत. पंचवीस वर्षांच्या

बोट कंपनीच्या आपल्या नोकरींत ‘ तुकाराम ’ बोटीच्या कप्तानानें एक दिवसहि कधीं रजा घेतली नव्हती म्हणतात. ज्या दिवशीं बोट बुडाली त्या दिवशीं क्षुल्लक आजाराच्या निमित्तानें रजा घेतली, आणि तो बचावला. हा झाला योगायोग. आणि त्याच्या जागीं बदली म्हणून त्या दिवशीं जो कप्तान गेला आणि बुडाला त्याची दैवगति, दुसरं काय ? तोहि योगायोगच !

क्षुल्लक कारणानें कांहीं प्रचंड घडामोडी झाल्या तरीहि आपण पुष्कळ वेळां योगायोगच म्हणतों. क्लिओपात्राच्या अलौकिक सौंदर्यामुळें सीझर, अँटनी यांच्यासारखे वीरश्रेष्ठ पागल झाले, आणि त्यामुळें मोठीं युद्धें आणि प्रचंड ऐतिहासिक घडामोडी झाल्या. कुणींसं म्हटलं आहे कीं, या क्लिओपात्राचं नाक अर्ध्या इंचानं लांब असतं तर इतिहास वेगळाच झाला असता ! म्हणजे ती जर इतकी सुंदर नसती तर हे इतिहास घडवणारे पुरुष पागल झाले नसते आणि पुढल्या घडामोडी टळल्या असत्या. दुसरी एका राजाची गोष्ट सांगतात. युद्धावर निघतांना त्याच्या घोड्याच्या नालांतला एक खिळा निखळला. तो व्यवस्थित लावण्याचा राजानें आळस केला. पुढें युद्धाला तोंड लागलं तेव्हां घोड्याचा नाल निखळून पडला. नाल गेल्यामुळें घोडा पडला. घोड्यामुळें राजा खालीं आला. राजा पडलेला पाहून त्याचं सैन्य सैरावैरां पळूं लागलं. राजाचा युद्धांत पराजय झाला. एका खिळ्यामुळें युद्ध हातचं गेलं ! काय योगायोग !

एखादं स्वप्न खरं झालं म्हणजेहि ‘ काय योगायोग ! ’ असे उद्गार तोंडावाटे बाहेर पडतात. आपल्या एखाद्या मित्राचं लग्न ठरलंय आणि आपण त्याच्या लग्नाला जाण्याची तयारी करतों आहोंत असं स्वप्न सकाळीं पडावं आणि दुपारीं पोस्टाच्या शिपा-’ यानें त्या मित्राचं, ‘ माझं लग्न ठरलंय्–तूं आलंच पाहिजेस !

अशा अर्थाचं पत्र आणून द्यावं. काय विलक्षण योगायोग असं आपण म्हणतों.

जेव्हां आपली मति चालत नाहीं, जेव्हां तर्कशुद्ध कारण देतां येत नाहीं, तेव्हां आपण आश्चर्यचकित होऊन ‘ काय योगायोग ! ’ असं म्हणतों. आपल्या मनांत मित्राला भेटण्याचा विचार येऊन तो आपणांला भेटायला यावा; किंवा तिकडे आपल्या मित्राचं लग्न ठरावं आणि इकडे आपणाला स्वप्नांत ती गोष्ट दिसावी; या घटनांचा परस्परसंबंध कांहीं दाखवतां येत नाहीं,—कार्यकारण-भाव सांगतां येत नाहीं. पण माणसाला कारण शोधून काढल्या-शिवाय चैन पडत नाहीं. त्याच्या या जिज्ञासेंतच त्याच्या प्रगतीचं बीज आहे. या जिज्ञासेमुळेंच विज्ञानाचा विकास झाला आहे. सामान्य मनुष्य योगायोग किंवा दैवगति म्हणून स्वस्थ बसतो. फार तर परमेश्वराची इच्छा किंवा भूतचेष्टा म्हणून योगायोगाची वासलात लावतो. पण शास्त्रज्ञ इतक्या सहजपणें स्वस्थ बसूं शकत नाहीं. तो तर्काला पटेल असं या योगायोग वाटणाऱ्या घटनांचंहि कारण शोधण्याचा प्रयत्न करीत असतो.

अशा कांहीं प्रयत्नांची माहिती तुम्हांला उद्बोधक वाटेल याबद्दल माझी खात्री आहे. माझ्या मनांत विचार येतो, तसाच माझ्या मित्राच्या येतो, यांत केवळ योगायोग नसून विचारसंक्रमणाचं किंवा टेलिपथीचं शास्त्र आहे काय किंवा कांहीं स्वप्नं खरीं होतात,—पुढें होणारं आधींच दिसतं म्हणजे भविष्यकाळाचा पट विणून अगोदरच तयार असतो, —बहुतेकांना तो दिसत नसला तरी कांहींना दिसतो. म्हणजे ‘ काळ ’ हा पदार्थ तरी काय आहे किंवा कांहीं लोक तुमच्या मनांतला विचार सांगूं शकतात म्हणजे अंत-र्ज्ञान किंवा क्लेअर- व्हॉयन्स अशी कांहीं शक्ति माणसाला आहे कीं काय वगैरे प्रश्नांचा कांहीं शास्त्रज्ञ कसून विचार करीत आहेत.

त्यांना फारसं यश अजून आलेलं नाहीं, पण त्यांचे प्रयोग खूपच मनोरंजक आहेत. लंडन युनिव्हर्सिटीचं ‘ कौन्सिल ऑफ् सायकिकल रीसर्च ’ नांवाचं स्वतंत्र खातं आहे. आणि त्यांत कांहीं नामांकित विद्वान् काम करीत आहेत.

मघाशीं, स्वप्नांत भविष्यकाळाचं दर्शन होऊं शकतं काय, या प्रश्नाचा मीं उल्लेख केला होता. या प्रश्नावर मि. जे. डब्ल्यू. डन् नांवाच्या एक विद्वानानें ‘ ॲन् एक्स्पेरिमेंट् वुइथ् टाइम् ’ नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. यांत त्यानें काळासंबंधीं एक नवीनच सिद्धान्त मांडला आहे. या विषयावर प्रयोग करण्याची प्रेरणा डन्ला, त्याला पडलेलीं कांहीं स्वप्नं खरीं झाल्यामुळेंच झाली. एक-दोनदां असं झाल्याबरोबर डन्नें स्वप्न पडल्याबरोबर तें तसंच्या तसं तपशीलवार लिहून ठेवण्याचं तंत्र बसवलं. संवयीनें, स्वप्नं पडल्याबरोबर तो जागा होऊं लागला, आणि स्वप्नांची स्मृति अगदीं ताजी आहे तोंच तें सर्व स्वप्न लिहून ठेवूं लागला. अशा अनेक स्वप्नांचीं काळजीपूर्वक टांचणें ठेवल्यानंतर त्याच्या हळूहळू लक्षांत येऊं लागलं कीं आपल्या स्वप्नांत कांहीं अंश भूतकाळाचा आहे तर कांहीं भविष्यकाळाचा आहे.

अशा तऱ्हेचीं स्वप्नं पडणं ही एक अपवादात्मक गोष्ट आहे कीं काय, आपणांलाच कांहीं विशेष शक्ति आहे कीं काय हें तपासून पाहण्याकरितां डन्नें आपल्या चार-पांच मित्रांनाहि पडलेलीं स्वप्नं लिहून ठेवण्याचं आपलं तंत्र शिकवलं, आणि त्यांनींहि स्वतःचीं बरींच स्वप्नं लिहून ठेवलीं. त्या स्वप्नांचा अभ्यास केल्यानंतर डन्च्या ध्यानांत आलं कीं अस्पष्टपणें कां होईना, पण भविष्याचा कांहीं अंश सर्वांनाच, स्वप्नांत दिसणं शक्य आहे आणि तो तसा दिसतो. ज्या अर्थीं भविष्याची अंधुक कां होईना, थोडी-बहुत कल्पना येऊं शकते, त्या अर्थी आपण ज्याला भविष्य म्हणतों तें आधींच सर्व ठरून गेलेलं

—तयार झालेलं असतं हें उघड आहे. काळ म्हणजे अनंत पायऱ्या असलेला एक धांवता जिना. आपण या जिन्यावरून नेहमींप्रमाणें पुढें तोंड करून न चढतां जणुं काय पाठ करून वर चढतों आहोंत आणि जिना पायांखालून सरकत खालीं जातो आहे. लंडनच्या टय़ूब-रेल्वेच्या स्टेशनांत असे घडघड घडघड सरकणारे जिने आहेत. ते पाहिलेल्या माणसाला या डन्‌च्या सरकत्या किंवा धांवत्या जिन्याची अधिक चांगली कल्पना येईल. पायांखालून पुढें सरकलेल्या पायऱ्या म्हणजेच भूतकाळ आपणांला दिसतो; पण आपण पाठ करून वर चढत असल्यामुळें पायांखालीं येऊं घातलेल्या पायऱ्या किंवा भविष्यकाळ आपणांला दिसत नाहीं. कांहीं स्वप्नांत आपण जणुं काय किंचित् मागें वळून पाहतों, आणि भविष्याचं थोडंसं दर्शन आपणांला होतं.

डन्‌च्या या सिद्धान्ताप्रमाणें माणसाचा भविष्यकाळ आधींच तयार होऊन राहिलेला असतो. खरोखर असं जर असेल आणि माणसांना कधीं काळीं हा सिद्धान्त पटला तर कांहींहि करण्याकरितां हातपाय हलवण्याचं माणसं नाकारतील ! मोठमोठींच कार्यं काय, पण लहानसहान कृत्येंहि माणसं करणार नाहींत. करायचंच काय कांहीं करून ? सर्व कांहीं तयारच आहे. काळ सरकेल तसं तें दिसणार आहे ! यासंबंधीं डन्‌चं म्हणणं काय आहे तें मला माहीत नाहीं, आणि सध्यां तरी डन्‌चा हा सिद्धांत म्हणजे एक अभिनव कल्पना,—यापेक्षां अधिक कांहीं नाहीं, असंच विचारवंत समजतात. पण योगायोगासंबंधीं प्रयोग काय चाललेत हें यावरून समजतं.

डन् याच्या सिद्धान्ताबद्दल कुणी कांहीं म्हणो, पण त्याचं संशोधन प्रामाणिक आहे याची कुणी शंका घेत नाहीं. काळ ही एक चमत्कारिक गोष्ट आहे खरी. भविष्य आधींच तयार असतं कीं नाहीं

कुणाला ठाऊक, असं आपण म्हणूं,–पण भूतकाळ मात्र गेला तो गेलाच, पुन्हा दिसणं शक्य नाहीं, याबद्दल आपली खात्री असते. पण आतां कांहीं विश्वसनीय पुरावा उपलब्ध झाला आहे. १९०१ सालीं मिस् मोबर्ले आणि मिस् जुर्दा नांवांच्या दोन इंग्लिश स्त्रिया पॅरिस-जवळचा प्रख्यात व्हेर्साय राजवाडा पाहायला गेल्या होत्या. व्हेर्सा-यचा हा राजवाडा आणि त्याच्याभोंवतालच्या बागा इतिहासप्रसिद्ध आहेत. १७८९ सालीं फ्रेंच राज्यक्रांति झाली, त्या वेळीं प्रख्यात राणी मारी आंत्वानेत् याच राजवाड्यांत राहात होती. १९०१ सालीं मिस मोबर्ले आणि मिस जुर्दा या ऐतिहासिक राजवाड्याच्या बागांतून फिरत असतां त्यांना एक विचित्र अनुभव आला. तो त्यांनीं ' ॲडव्हेंचर ' नांवाच्या एका लहानशा पुस्तिकेंत लिहून ठेवला आहे. अठराव्या शतकांतले म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळचे कपडे घातलेले स्त्रीपुरुष त्यांना त्या बागेंत दिसले. त्या काळचे कपडे घातलेला राजवाड्यांतला एक नोकर एका दारांतून बाहेर आला आणि त्यानें त्या बायांना हटकलंसुद्धां. बागेंत कांहीं पाण्याचे झरे आणि त्यांवरले लांकडी पूलहि त्या बायांनीं पाहिले. हें पाहात असतांना त्या बायांना चमत्कारिक असं कांहीं वाटत नव्हतं. पण नंतर त्यांच्या ध्यनांत आलं कीं, राजवाड्याच्या बागेंत तसे झरे आणि लांकडी पूल सध्यांच्या काळीं मुळींच नाहींत. फार काय, ज्या दारांतून तो नोकर बाहेर येऊन त्यानें त्यांना हटकलं तें दार शें-पन्नास वर्षांपूर्वींच बुजवून टाकलेलं आहे !

या बायांनीं आपणांला दिसलं तें सर्व तपशीलवार लिहून काढलं आणि तें प्रसिद्ध केलं. त्या बाया कुणी अशा तशा साध्या-भोळ्या स्त्रिया नव्हत्या. ऑक्सफर्ड येथील ' सेंट् ह्यूज् ' कॉलेजची एक भूतपूर्व प्रिन्सिपॉल होती तर दुसरी चालू प्रिन्सिपॉल होती. इति-हासांत वाचलेलं त्यांना डोळ्यांसमोर दिसून केवळ भास झाला

असं म्हणावं तर त्यांनीं वर्णन केलेल्या कांहीं विशेष गोष्टी त्यानंतर कित्येक वर्षांनीं–पंचवीस-तीस वर्षांनीं इतिहास-संशोधकांच्या दृष्टोत्पत्तीला आल्या आहेत. त्या बाया गेल्या होत्या त्या काळांत त्या कुणाला माहीत नव्हत्या आणि इतिहासांतहि नमूद झालेल्या नव्हत्या ! या बायांच्या प्रामाणिकपणाची कुणींच शंका घेतलेली नाहीं. आणि तसं कांहीं कारणहि नाहीं. मग झालं काय ? १७८९ साल म्हणजे अठरावं शतक अजूनहि व्हेर्सायच्या राजवाड्यांत अदृश्यपणें घुटमळतंय आणि कांहीं चमत्कार होऊन त्या दोन बायांनीं चुकून विसाव्या शतकांतून त्या दोनशें वर्षांपूर्वीच्या काळांत पाऊल टाकलं आणि थोडा वेळ त्यांनीं तो काळ पाहिला ! रायगड पाहायला गेलेल्या आपल्या इथल्या एखाद्या प्रवाश्याला शिवराज्याभिषेकाचा उत्सव असाच पाहायला मिळाला तर काय मजा होईल ?

जगांत योगायोग नांवाची गोष्टच नाहीं, प्रत्येक घटनेला कांहीं तरी कारण असतंच हें सिद्ध करण्याची शास्त्रज्ञांची किती धडपड चालली आहे, ही गोष्ट या सर्व प्रयोगांवरून दिसून येते. या धडपडींतूनच माणूस जीवनावर अधिकाधिक प्रभुत्व मिळवतो आहे, हें खरं; पण या धडपडींत माणसाला कधीं संपूर्ण यश मिळेल काय ? मी याहिपुढें जाऊन विचारतों, सर्वच कारणं कळालीं आणि योगायोग म्हणायला कांहीं उरलंच नाहीं, तर जीवनांत जगण्यासारखं कांहीं उरलं नाहीं म्हणून रडणाऱ्या शिकंदरासारखीच मनुष्यजातीची अवस्था होणार नाहीं का ?

## २१ पानिपत झालं नसतं ?

एकदां गणूकाका आणि मी कसल्या तरी कार्यासाठीं देणगी मागण्याकरितां एका श्रीमंत गृहस्थाकडे गेलों होतों. त्या गृहस्थानं मोठ्या आदबीनं आमचं स्वागत केलं, आणि आमच्या कामाची विचारपूस केली. आम्हीं काम सांगतांच, "मग किती पैसे देऊं ?" असा प्रश्न त्यानें केला. गणूकाका इकडे तिकडे पाहूं लागले. मी मोठा थोरला श्वास घेऊन, "शंभर रुपये तुम्हीं द्यावे" असं म्हणालों.

"हात्तिच्या" असं म्हणून तो गृहस्थ आंत गेला आणि शंभर रुपयांची एक नोट आणून त्यानं आमच्या हातावर ठेवली. पावती वगैरे देऊन, त्याचे मनःपूर्वक आभार मानून आम्ही परत फिरलों. त्याच्या घरांतून बाहेर पाऊल टाकतांच गणूकाका मला म्हणाले, "अगदीं बावळट आहेस तूं !"

"तो कां बुवा ?" मीं आश्चर्यचकित होऊन विचारलं.

"अरे, इतका चांगला गृहस्थ तो, पांचशें रुपये मागितले असतेस तरी त्यानं या सत्कार्याकरितां सहज दिले असते" काका म्हणाले.

"खरंच काका—पांचशें मागितले असते तर बरं झालं असतं!" मी म्हणालों.

" तूं काय मागतोस–तूं बरं झालं असतं मागाहून म्हणणार !" काका उद्गारले, " कांहीं झालं तरी आपले गुजराती बंधू म्हणतात तेंच खरं !"

" काय ?" मीं विचारलं.

" पश्चात् बुद्धि बामणिया न आगळबुद्धि बनिया !" काका म्हणाले, " आपण बामण किंवा बुद्धिजीवी लोक मागाहून विचार करणार,–असं असं केलं असतं तर बरं झालं असतं. बनिया किंवा व्यापारी माणूस आधींच बरोबर हिशेब करतो नि मग काय बोलायचं तें बोलतो, तुझ्या जागीं असा कुणी आगळबुद्धि बनिया असता तर त्यानं हजार रुपये मागितले असते. म्हणजे पांचशें तरी सहज हातीं पडले असते."

".जाऊं द्या, आतां काय त्याचं ? आपण आहोंत तसे आहोंत–आतां कांहीं नवे होणार नाहीं आपण !" मीं म्हणालों,

मीं स्वतःचं समाधान करण्याचा प्रयत्न केला खरा, पण आपलं चुकलं अशी माझ्या मनाला चुटपूट लागली यांत शंका नाहीं. या पश्चातबुद्धीचा मला अगदीं राग आला. व्हायचं तें होतं. तें कांहीं पुन्हां नीट करतां येत नाहीं या पश्चात्बुद्धिमुळं मनाला उगाच त्रास मात्र होतो. आयुष्यांतले हे लहान सहान अनुभवच कशाला मोठमोठ्या ऐतिहासिक घडामोडीसंबंधींही केव्हां केव्हां साऱ्या समाजाला किंवा सबंध राष्ट्राला उगाच चुटपूट लागते. पानिपताच्या पराजयामुळं महाराष्ट्रांत लाखों कुटुंबं उघड्यावर पडलीं. कुणीतरी म्हणाला, –कुणाची तरी पश्चात्बुद्धि पुटपुटली मराठ्यांना विजय मिळत होतां, पण तेवढ्यांत हत्तीवरून भाऊसाहेब घोड्यावर बसून गर्दींत घुसले आणि फौजेला दिसेनासे झाले. त्यामुळें फौजेचा धीर सुटला आणि ती सैरावैरां पळूं लागली. त्या लाखों कुटुंबांना वाटलं असेल, सदाशिवरावभाऊ

हत्तीवरून खालीं आले नसते तर किती बरं झालं असतं ! वॉटर्लूच्या लढाईंत नेपोलियनचा पराभव झाला, त्याचंहि कारण असंच सांगतात. कुमक घेऊन येणारा सेनापति ब्लूशर पांच मिनिटं उशिरां आला त्यामुळं म्हणे नेपोलियनचा पराभव झाला. फ्रेंच राष्ट्राला वाटलं असेल या पांच मिनिटांनीं केवढा घोटाळा केला. इतिहासाची उलटापालट झाली. पण या वाटण्याचा उपयोग काय ? म्हणूनच केव्हां केव्हां वाटतं, माणसाला दिली कशाला ही पश्चात्‌बुद्धि !

मनाला त्रास झाला म्हणजे असं वाटतं खरं, पण पश्चात्‌बुद्धीचा कांहींच उपयोग नाहीं, हें खरं नाहीं. थोडा शांतपणें विचार केल्यास माणूस इतर प्राण्यांहून श्रेष्ठ आहे त्या श्रेष्ठत्वाचं मूळ थोडं तरी या पश्चात्‌बुद्धींत आहे, असं दिसून येईल. आपल्या कृतीचा माणूस पुन्हां विचार करतो, इतर प्राणी तसा विचार करीत नाहींत. तेव्हां त्या प्राण्यांच्या हातून त्याच त्याच चुका पुन्हां पुन्हां होतात. या पश्चात्‌बुद्धीचा,–या पुन्हां विचार करण्याचा, पुष्कळ वेळां तात्कालिक कांहीं उपयोग झाला नाहीं, तरी एकदां झालेली चूक पुन्हां होण्याचा संभव कमी होतो. इतर प्राणी आहेत तिथंच आहेत, माणसाची सारखी प्रगति, सारखी सुधारणा होत गेली आहे त्याचं मुख्य कारण हेंच.

या पश्चात्‌बुद्धीचं आणखी एक स्वरूप आहे. त्याचा मोठा मजेदार उपयोग आहे असं आधुनिक मानसशास्त्रज्ञ सांगतात. शास्त्रज्ञांचीं हीं मतं मीं वाचलीं होतीं; पण त्यांचा एकदां प्रत्यक्ष अनुभव आला तेव्हां तीं मला चांगलीं पटलीं. आम्ही तिघे-चौघे मित्र एकदां गप्पा करीत बसलों होतों. इतक्यांत आमच्या परिचयाचे एक गृहस्थ तिथं आले. बोलतां बोलतां आदल्या दिवशीं त्यांच्या ऑफिसांतल्या हेडक्लार्कशीं त्यांचा खटका उडाला होता, त्याचं

रसभरीत वर्णन त्यांनीं केलं.

ते म्हणाले, "मीं त्याला स्पष्ट सांगितलं, यापेक्षां अधिक कांहीं होणार नाहीं; नसेल पसंत तर हा घ्या माझा राजीनामा. कांहीं बोलला नाहीं. चूप बसला त्यानंतर." तें गृहस्थ गेल्यानंतर आमचा एक मित्र म्हणाला, "तो हेडक्लार्क माझ्या ओळखीचा आहे. कांहीं कामाकरितां मी त्याला काल भेटायला गेलों होतों. तो थोडा कामांत होता म्हणून कपाटापलीकडच्या खुर्चीवर त्यानं मला बसायला सांगितलं. ज्या खटक्याचं या गृहस्थांनीं आतां वर्णन केलं तो सर्व मीं माझ्या कानांनीं काल ऐकला आहे. या गृहस्थांनीं मला पाह्यलं नाहीं, कारण मी कपाटाच्या पलीकडे होतों."

"मग तुला म्हणायचंय् काय?" आम्हीं त्या मित्राला विचारलं.

"म्हणायचंय् इतकंच," तो म्हणाला, 'कीं त्यांनीं सांगितलं तसं कांहींच झालं नाहीं— हे स्पष्टही बोलले नाहींत कीं राजीनाम्याचीहि त्यांनी धमकी दिली नाहीं. हे तिथून गुपचूप निघून गेले!"

"मग तावातावानं उगाच खोटं कशाला सांगत होते आम्हांला?" एकजण म्हणाला.

"खोटं नाहीं." मी म्हणालो, "आम्हांला खोटं सांगून त्यांना काय मिळणार होतं? कांहींच नाहीं. तें भांडण झाल्यावर ते परत आपल्या जागेवर येऊन बसले आणि त्यांच्या मनांत पश्चात्बुद्धि जागृत झाली, कीं असं असं बोललों असतों तर बरं झालं असतं. पण तिथं कांहीं धीर आला नाहीं. पण मनाला वाईट वाटतच होतं. तेव्हां जें व्हायला पाहिजे होतं तें झालं असं तुम्हां-आम्हांला ते सांगत होते. प्रत्यक्ष हेडक्लार्कची खरडपट्टी काढतां आली नाहीं, पण तुमच्या आमच्या- समोर काल्पनिक खरडपट्टी काढतां आली,

तेवढंच मनाला समाधान. आतां त्यांना हलकं वाटत असेल ! ”

पश्चात्बुद्धीचा हा झाला आत्मसमाधानाकरितां उपयोग. असा उपयोग करणाऱ्या माणसाची आली तरी आपणांला दयाच येईल, राग येणार नाहीं. पण कांहीं माणसं नंतर सुचलेल्या या बुद्धीचा उपयोग आपले दोष झांकण्याकरितां किंवा आपल्या सदसद्विवेक-बुद्धीला गप्प बसविण्याकरितांसुद्धां करतात. एका मालकासंबंधीं मीं ऐकलेली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. युद्धकाळांत आपल्या धंद्यांत तो माणूस अमूप फायदा करीत होता, पण आपल्या नोकरांचे पगार मात्र विशिष्ट मर्यादेपलिकडे वाढवायला तो मुळींच तयार नव्हता. त्याचे मित्र त्याला म्हणाले, “ अरे इतका नफा तुला होतोय्, नोकरांचे पगार कां वाढवीत नाहींस ! ”

त्यावर त्या परोपकारी मालकानं दिलेलं उत्तर मासलेवाईक आहे. तो म्हणाला, “ त्याचं असं आहे कीं यापेक्षां जास्त पगार त्यांना दिला तर त्या बिचाऱ्यांना ‘ इन्कम् टॅक्स ’ द्यावा लागेल! ”

ही गोष्ट कदाचित् काल्पनिक असेल. पण मोठमोठ्या राष्ट्रां-नींहि याच जातीचे युक्तिवाद केल्याचे दाखले इतिहासांत आहेत. आपण भारतांत जे आलों तें केवळ सुराज्य आणि सुव्यवस्थेचा सुकाळ करून, इथल्या अजाण जनतेचा उद्धार करण्याकरितांच आलों, असं ब्रिटिश साम्राज्यवादी सांगत नसत का ? अफाट आफ्रिका खंडाची पिळवणूक करीत असतां अजूनही कित्येक गोरीं राष्ट्रें, ‘ काय करणार ? काळ्या लोकांचा उद्धार करण्याच्या जबाबदारीचं हें ओझें—हें ‘ व्हाइट मॅन्स् बर्डन् ’—परमेश्वरानं आपल्या डोक्यावर दिलंय् ’ असं म्हणत नाहींत का ? सदसद्विवेक-बुद्धीला गप्प बसविण्यांत तर आपण सर्वच वाकबगार असतों. एखाद्या दिवशीं आळसानं कामाला जायचं नाहीं, आणि मनाला मात्र सांगत बसायचं कीं आजचं काम महत्त्वाचं नव्हतंच—तसं

एखाद्या दिवशीं काम केलं नाहीं कीं दुसऱ्या दिवशीं दुप्पट काम होतं, वगैरे वगैरे ! भिकाऱ्याला पैसा द्यायचा नाहीं; आणि मनाला जोरानं बजावायचं कीं 'भिकाऱ्यांना पैसे देणं म्हणजे निरुद्योगाला उत्तेजन देण्यासारखं आहे,

पश्चात्‌बुद्धि एकंदरींत चांगली नाहीं असं म्हणणारे बहुतेक लोक पूर्वबुद्धीचे मोठे उत्साही पुरस्कर्ते असतात. पूर्वबुद्धि याचा अर्थ हाच की एखादी गोष्ट केल्यानंतर मग विचार करीत बसण्यापेक्षां आधीं सर्व कांहीं विचार करावा. हें पूर्वबुद्धीचं तत्त्वं कुणीहि मान्य करील. पण व्यवहारांत तें कितीसं शक्य आहे ? 'वर माग' म्हटल्याबरोबर, 'माझ्या नातवाला सिंहासनावर बसलेला मला पाहूं द्या,' असा वर आधीं पूर्णपणें सर्व विचार करून मागणारा आंधळा ब्राह्मण पुराणांतच किंवा कल्पित कथेंतच सांपडायचा. नातवाला राजपद आणि स्वतःला डोळे आणि दीर्घायुष्य एका वरांत त्यानं घेऊन टाकलं ! बहुतेक वर मागणारे मिडाससारखे असतात. 'मी हात लावीन त्याचं सोनं होऊं दे' असा वर सुवर्णलोभानं त्यानं मागितला; आणि मग अन्नाला हात लावला, सोनं झालं; पाण्याला हात लावला, सोनं झालं; असं होऊन उपासानं त्याला मरावं लागलं !

REFBK-0013741
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६६७९ वि: निबंध
क्रमांक १५०२ नों. दि. २५।८।६९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३०८९

माफक किमतींत

## मुलां-मुलींसाठीं उत्कृष्ट पुस्तकें

### वि. वि. बोकील

| | | | |
|---|---|---|---|
| * विजय | १–५० | * मीनाच्या गोष्टी | १–५० |
| * तुकारामाचा परिस | १–५० | * मोठी मीना | १–५० |
| * लाडका राजा | १–५० | * निवडक वसंत | १–५० |
| | | * शहेनशहा | २–०० |

### पंडित अनंत कुलकर्णी (संपादित)

* किशोरकुंज, भाग पहिला १–५०
* किशोरकुंज, भाग दुसरा १–५०
* माझं लहानपण, भाग पहिला व दुसरा २–००

### चिं. वि. जोशी

* निवडक गुंड्याभाऊ १–५०

### का. न. केळकर

* शंभर वर्षांपूर्वी १–५०

कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार पेठ, पुणें २

माफक किमतींत

# मुलां-मुलींसाठीं उत्कृष्ट पुस्तकें

**राम अनंत कुलकर्णी**

* आंकडयांची मौज आणि फौज,
भाग १, २ व ३ प्रत्येकीं १-५०
* चौरसांतील आंकडे, भाग १ व २ प्रत्येकीं १-५०

**शान्ता ज. शेळके**

* तालपुष्कर १-५० * मालतीमाधव २-००

**माधव कानिटकर**

* भारताचे भाग्यविधाते, भाग पहिला १-५०
* भारताचे भाग्यविधाते, भाग दुसरा १-५०

**दा. न. शिखरे**

* स्वतंत्र भारताची भरारी २-५०

**अनंत काणेकर**

* निवडक गणूकाका १-५०

**रामतनय**

* मोहित्यांची मंजुळा (सं.) २-००

**कुलकर्णी ग्रंथागार,**

१८६ शनवार पेठ, पुणें २